लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps | GET IT ON Google play

**संपादकीय / ०३**

***दीपनगरमध्ये कामात भ्रष्टाचार एक अधिकारी निलंबित***

*जळगाव जिल्ह्यातील भुसावळ नजीक असलेल्या दीपनगर औष्णिक विद्युत केंद्रात काम न करताच कामाची बिले काढल्या प्रकरणी एक अधिकारी नामे इंगळे यांना निलंबित करण्यात आले असून, चीफ इंजिनिअर यांची बदली करण्यात आली आहे.*

जळगाव, सोमवार, दि.१३ जुलै २०२६ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024–26 | • अंक –२३५ • पाने ६ • किंमत ३ रु.

**सोने-चांदी**

- सोने (प्रति १० ग्रॅम) : १,४३,७००
- चांदी (प्रति १ किलो): २,२२,५००

**तापमान**

- कमाल : ३७ अंश सेल्सिअस
- किमान : २६ अंश सेल्सिअस

**अग्निहोत्र समय**

| दि.१३ | दि.१४ |
|---|---|
| सूर्योदय : ५.५८ वा. | सूर्योदय : ५.५८ वा. |
| सूर्यास्त : ७.०९ वा. | सूर्यास्त : ७.०९ वा. |

**महत्वाचे »»**

**बंदी झुगारून धबधब्यावर गेलेले दोघेजण बुडाले**

**पुणे** – पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या पर्यटकांवर काळाने घाला घातल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. माणगांव तालुक्यातील प्रसिद्ध अशा देवकुंड धबधब्यात पुण्यातील दोन पर्यटक बुडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. प्रशासनाने बंदी घातलेली असतानाही नियमांचे उल्लंघन करून धबधब्याखाली आनंद घेत असताना हे दोघे जण वाहून गेले असून सध्या ते बेपत्ता आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातून १७ जणांचा एक ग्रुप पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी देवकुंड धबधब्यावर आला होता. सध्या पावसाचा जोर पाहता रायगड जिल्हा प्रशासन आणि माणगाव स्थानिक प्रशासनाने देवकुंड धबधब्यासह तालुक्यातील सर्वच वर्षा पर्यटन स्थळांवर पर्यटकांना जाण्यास कडक निर्बंध घातले आहेत. मात्र, असे असतानाही या ग्रुपमधील पर्यटक धबधब्यापर्यंत पोहोचले. धबधब्याच्या आवारात बंदी असतानाही हे पर्यटक पाण्याच्या प्रवाहाखाली आनंद घेत होते. याच दरम्यान पाण्याचा अंदाज न आल्याने दोन पर्यटक पाण्यात बुडाले. या घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळाकडे रवाना झाले असून स्थानिक बचाव पथकाच्या सहाय्याने बेपत्ता पर्यटकांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

**अभिनेत्री मेधा मांजरेकर यांना कॅन्सरची लागणा**

**मुंबई** – मराठी चित्रपटसृष्टीतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या पत्नी मेधा मांजरेकर यांनी स्वतःला कॅन्सर झाल्याची माहिती सोशल मीडियावर दिली आहे. उपचारांचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर त्यांनी एक भावनिक पोस्ट शेअर करत या कठीण प्रवासात साथ देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मेधा मांजरेकर यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर उपचारांच्या संपूर्ण प्रवासाबद्दल लिहिले आहे. त्यांनी सांगितले की, आयुष्यात असे काही प्रवास असतात जे तुम्हाला कायमचे बदलून टाकतात. हा त्यापैकीच एक आहे. माझ्या उपचारांचा एक टप्पा संपत आला आहे आणि माझा वाढदिवस जवळ येत आहे, तेव्हा मी मागे वळून पाहते. निदानाकडे नाही. शस्त्रक्रियेकडे नाही. केमोथेरपीकडे नाही. रेडिएशनकडे नाही. मला आठवते ती ईश्वरी कृपा.

# जुलै अखेरीस मान्सून पुन्हा सक्रीय होण्याचे संकेत

## प्रशांत महासागरात ट्रॉपिकल सिस्टीम, लो प्रेशर एरिया बनण्याची प्रक्रीया सुरु : भारताला आधार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** ✍ वृत्तसंस्था

गेले दोन ते तीन दिवसांपासून पावसाने ओढ दिली आहे. भारतात मान्सून देशभर पसरल्यानंतर अचानक मध्येच त्याला ब्रेक लागला आहे. हवामानात सध्या कुठे पाऊस तर कुठे शुष्क वातावरण आहे. महाराष्ट्रातील अनेक भागात पावसाने ओढ दिली आहे. शेतकऱ्यांनी चिंता लागून राहिली आहे. परंतू त्यातल्या त्यात एक चांगली बातमी आली आहे. पश्चिम प्रशांत महासागरात अनेक हवामान सिस्टीम तयार होत आहे. परंतू चांगली बातमी ही की अनेक हवामानाचे मॉडेल सांगत आहेत की यातील काही बंगालाच्या उपसागरापर्यंत पोहचले. अनेक हवामानाचे सिस्टीम तयार होत असून त्या फेव्हरेबल जागांवर आहे. त्यामुळे १८ ते २५ जुलै दरम्यान मान्सून पुन्हा सक्रीय होऊ शकतो. परंतू मध्य आणि उत्तर भारतात यात अडथळा येऊ शकतो. पूर्व भारतात पाऊस बरसत आहे. परंतू पश्चिम, उत्तर आणि मध्य भागात दुष्काळाचा सामना सुरु आहे. यामुळे पिकांवर परिणाम होत आहे. खास करुन भात, मका आणि



डाळी या पिकांवर याचा परिणाम होणार आहे. जलशयांची पातळी कमी होत आहे. त्यामुळे पुणे, मुंबई येथील पिण्याच्या पाण्यावर आता पासूनच कपात सुरु झाली आहे. पिण्याचे पाणी आणि सिंचनाचा प्रश्न आवासून उभा आहे. मान्सूनची ट्रफ लाईन तिच्या सामान्य स्थितीपासून हटले. त्यामुळे बाष्प घेऊन येणारे वारे पुरेशा प्रमाणात पोहचत नाहीएत. त्यामुळे चिंता निर्माण झाली आहे. अशात प्रशांत महासागरातून येणारी बातमी आशेचे किरण बनून येत आहे. प्रशांत महासागरात ट्रॉपिकल सिस्टीम वा लो प्रेशर एरिया बनण्याची प्रक्रीया सुरु आहे. जर ही सिस्टीम पश्चिमेच्या दिशेने वाढली आणि भारताच्या जवळ बंगालचा उपसागरात प्रवेश केला आहे, त्यामुळे ती मान्सूनची मजबूत करु शकते. आता १८ ते २५ जुलै हा कालावधी मान्सूनसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. जर बंगालच्या उपसागरात पॅसिफिक महासागरातील प्रणाली सक्रिय झाली, तर त्या खालच्या पातळीवरील वाऱ्यांना बळकट देतील आणि त्यामुळे मान्सूनचा पट्टा पुन्हा सामान्य स्थितीत येऊ शकेल. यामुळे मध्य भारत, उत्तर भारत आणि राजस्थान-गुजरातसारख्या कोरड्या भागांमध्ये चांगला पाऊस पडू शकतो असे म्हटले जात आहे. ला-नीनासारखी परिस्थिती किंवा पॅसिफिकमध्ये विकसित होणाऱ्या प्रणाली भारताच्या मान्सूनला आधार देऊ शकतात. मात्र, जर या प्रणाली कमकुवत झाल्या किंवा त्यांनी दिशा बदलली, तर दुष्काळाची स्थिती अधिक गंभीर होऊ शकते.

# बारा दिवसांनी नाल्यातून बाहेर काढली कार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**वसई** ✍ प्रतिनिधी

वसई-विरारमध्ये १ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसाने आणि त्यानंतर आलेल्या पुरामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या महापुराच्या रौद्ररूपाचा एक धडकी भरवणारा पुरावा आता समोर आला आहे. वसईच्या राजीवली येथील वाघराळपाडा परिसरात नाल्यात वाहून गेलेली एक 'मारुती इको' कार तब्बल १२ दिवसांनंतर बाहेर काढण्यात आली आहे. मात्र, या कारची झालेली अवस्था



पाहून त्या दिवशीच्या पुराच्या भयानक वेगाची कल्पना येते. १ जुलै रोजी आलेल्या मुसळधार पावसामुळे वाघराळपाडा परिसरातील नाल्याला भीषण पूर आला होता. सलग १२ दिवसांनंतर आता पावसाचा जोर कमी झाल्याने आणि नाल्यातील पाण्याची पातळी ओसरल्याने शोधमोहीम सुरू करण्यात आली. या मोहिमेत मारुती इको कार चिखलातून बाहेर काढण्यात यश आले. मात्र, वेगाने वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात नाल्यातील मोठमोठ्या दगडांना आणि इतर वस्तूंना धडकल्यामुळे या कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला आहे. गाडीचा केवळ एक लोखंडाचा सांगाडा उरला असून, गाडी ओळखणेही कठीण झाले आहे. या महापुरात एकूण दोन चारचाकी आणि तीन दुचाकी वाहून गेल्याची माहिती समोर आली होती. त्यापैकी इको कार बाहेर काढण्यात आली असली, तरी दुसरी चारचाकी

पान २ वर »

# राम मंदिरातील देणगी चोरी ही क्षुल्लक बाब!

## अनुपम खेर यांचे अजब वक्तव्य : नेटकरी भडकले

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ प्रतिनिधी

राम मंदिरातील देणगी चोरीवर टिप्पणी केल्यामुळे ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना प्रचंड ट्रोलिंगचा सामना करावा लागला. राम मंदिरातील चोरी ही एक किरकोळ गोष्ट आहे, असं ते म्हणाले होते. "मुघलांनी देशाकडून जे काही लुटलं त्याच्या तुलनेत दोन ते सात कोटी रुपयांची कथित अनियमितता काहीच नाही. मुघल नेत्यांनी फक्त पैसाच नाही



तर हिंदूंचा सन्मानही लुटला आहे," असं वक्तव्य अनुपम खेर यांनी केलं होतं. यामुळे त्यांना सोशल मीडियावर तीव्र ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. अनेकांनी त्यांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली होती. आता अनुपम खेर यांनी कोणाचंही नाव न घेता पोस्ट शेअर करत टीकाकारांना प्रत्युत्तर दिलं आहे. एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत अनुपम खेर म्हणाले होते, "राम मंदिरातील देणग्यांच्या चोरीचा मुद्दा हा खूप छोटा विषय आहे. इतिहासात मंदिरांचा विध्वंस, लूटमार, तसंच हिंदूंवर झालेले अत्याचार हे त्याहून मोठे मुद्दे आहेत. जेव्हा मुघलांनी आपली मंदिरं तोडली होती, जेव्हा ब्राह्मणांची हत्या करण्यात आली होती, जेव्हा मंदिरांमधील धन लुटण्यात आलं होतं, महिलांवर अत्याचार झाले होते, या सर्वांत मोठ्या घटना होत्या. जर आपण त्या वेदनेतून पुढे येऊ शकतो, तर त्या तुलनेत ही खूपच छोटी गोष्ट आहे." त्यांच्या याच वक्तव्यावरून नेटकऱ्यांनी टीका केली. आता ट्रोलिंग होत असतानाच अनुपम खेर यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये

पान २ वर »

# प्रत्येक बाबतीत खोटं बोलून विश्वासघात केला!

## राऊत कुटुंबाविरोधात कौटुंबिक छळ, जादूटोणा विरोधी गुन्हा दाखल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ठाणे** ✍ प्रतिनिधी

ठाकरेंच्या शिवसेनेचे माजी खासदार विनायक राऊत त्यांचा मुलगा नगरसेवक गितेश राऊत यांच्यासह त्यांच्या संपूर्ण कुटुंबाविरोधात ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



विनायक राऊत यांची सून गिरीजा राऊत यांनी दिलेल्या तक्रारीवरून ठाण्यातील कापूरबावडी पोलीस ठाण्यात हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यामध्ये कौटुंबिक छळासोबतच 'जादूटोणा विरोधी कायद्यान्वये' गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गितेश राऊत शारीरिक संबंध ठेवण्यास असमर्थ होता, प्रत्येक बाबतीत खोटं बोलून विश्वासघात केला, असा आरोप गिरीजा राऊत यांनी केला. आता सून गिरीजा राऊत यांच्या आरोपावर विनायक राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधून स्पष्टीकरण दिले. गिरीजा राऊत यांनी पती गितेश राऊतांसह त्यांच्या कुटुंबीयांवर

पान २ वर »

# गर्भवती महिलेला टाके घातल्यानंतर इन्फेक्शन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**टिटवाळा** ✍ प्रतिनिधी

प्रसुतीनंतर एका महिलेला टाके घालताना इन्फेक्शन झाल्याची घटना टिटवाळा येथील रुग्णालयात घडली आहे. ही महिला प्रसुत झाल्यानंतर तिला घातलेले टाकले न सुकता चिघळल्याने पोटात पस झाल्याने या महिलेवर आता कल्याण-डोंबिवलीतील महापालिका रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



या महिलेच्या आईने आरोप केला आहे की टिटवाळा येथील डॉक्टरांनी नीट टाके न घातल्याने आपल्या मुलीला असह्य वेदना होत आहेत. या प्रकरणात हलगर्जी करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. टिटवाळा येथे एका महिलेवर प्रसुतीसाठी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यावेळी तिच्या टाक्यांमध्ये इन्फेक्शन झाले होते. या महिलेला कल्याण-डोंबिवली येथील महानगर पालिकेच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या रुग्णालयात या महिलेचे टाके

पान २ वर »

# ..तर पुन्हा ममता बॅनर्जी यांचं नेतृत्व स्विकारणार!

## पश्चिम बंगालमध्ये डाव फिरला, घडामोडींना वेग

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**कोलकाता** ✍ वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमध्ये दोन महिन्यांपूर्वी विधानसभेच्या निवडणुका झाल्या, या निवडणुकांमध्ये ममता बॅनर्जी यांचा पक्ष असलेल्या तृणमूल काँग्रेसचा मोठा पराभव झाला. पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता आली. पश्चिम बंगालची सत्ता तृणमूल काँग्रेसच्या हातातून निसटताच पक्षात मोठी फूट पडली. आधी आमदाराचा एक मोठा गट पक्षातून बाहेर पडला. त्यानंतर तब्बल २० खासदारांनी पक्षातून बंडखोरी केली. काही दिवसांपूर्वी तर अशी देखील चर्चा सुरू होती की, ममता बॅनर्जी या आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलिन करणार आहेत. परंतु आता सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. ती म्हणजे तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर गटाने पुन्हा एकदा ममता बॅनर्जी यांचं नेतृत्व स्विकारण्याची तयारी दर्शवली आहे. या संदर्भात तृणमूल काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि माजी मंत्री रवींद्रनाथ घोष यांनी रविवारी मोठं विधान केलं आहे.



रवींद्रनाथ घोष यांनी मोठा दावा केला आहे. की जर ममता बॅनर्जी यांनी आपला भाचा अभिषेक बॅनर्जी यांना सक्रिय राजकारणापासून दूर ठेवलं तर ज्या लोकांनी ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वामध्ये उठाव केला होता, त्यातील अनेकजण पुन्हा एकदा ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील तृणमूल पक्षात परततील आणि ममता बॅनर्जी यांचं नेतृत्व मान्य करतील. ऋतब्रत बॅनर्जी हे पश्चिम बंगाल विधानसभेचे विरोधी पक्षनेते आहेत. त्यांच्या नेतृत्वात काही दिवसांपूर्वी तब्बल ५८ आमदारांनी तृणमूल काँग्रेसमधून बंडखोरी करत आपला वेगळा गट स्थापन केला होता. विधानसभा अध्यक्षाकडून या गटाला मान्यता देखील देण्यात आली होती. त्यानंतर रवींद्रनाथ घोष हे देखील पक्षातून बंडखोरी करत या बंडखोर गटात सामील

पान २ वर »

# क्रिकेट निवड चाचणीत ८८ खेळाडूंची निवड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** ✍ प्रतिनिधी

जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजीत १४ वर्षाआतील मुलांची निवड चाचणी हे अनुभूती निवासी स्कूल च्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडांगणावर घेण्यात आली. या निवड चाचणी मध्ये जिल्ह्यातील विक्रमी ३०० खेळाडूंनी सहभाग घेतला. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे अधिकृत असलेल्या या निवड चाचणीमध्ये ८८ खेळाडूंची



प्राथमिक निवड करण्यात आली. निवड चाचणी अध्यक्ष संजय पवार यांच्या निवड समितीने ही निवड केली. याप्रसंगी निवड समितीचे निमंत्रक व जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव अरविंद देशपांडे उपस्थित होते. त्यांच्यासोबत संतोष बडगुजर, हितेश पटेल, सुयश बुरूकुल यांनी विशेष सहकार्य केले. जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन यांच्या मार्गदर्शनातून झालेल्या

पान २ वर »

# अभिनेते पवन कल्याण रुग्णालयात दाखल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ प्रतिनिधी

मुंबईच्या कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेते पवन कल्याण यांच्या उजव्या खांद्याची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पवन कल्याण यांना उपचारासाठी कोकिलाबेन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.



त्यांना दोन्ही खांद्यांमध्ये रोटेटर कफ आणि स्नायूंची गंभीर दुखापत होती आणि ते गेल्या बऱ्याच काळापासून खांद्याच्या दुखण्याने त्रस्त होते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार,

पान २ वर »

# सहलीला गेलेल्या विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा

## १६० पैकी ५५ ते ६० विद्यार्थिनी बाधित : पालकांमध्ये भीतीचे वातावरण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ठाणे** ✍ प्रतिनिधी

ठाण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, वर्तकनगरमधील एका खासगी शाळेची सहल गेली होती. या सहलीमध्ये १६० मुलं सहभागी झाले होते, यातील ५५ ते ६० विद्यार्थ्यांना सहलीदरम्यान अन्नातून विषबाधा झाल्याचं समोर आलं आहे. दरम्यान आता या प्रकरणाची गंभीर दखल ठाणे महापालिकेचे उपमहापौर कृष्णा पाटील यांच्याकडून घेण्यात



आली आहे. त्यांनी या धक्कादायक प्रकारानंतर जिल्हाधिकारी, शाळा प्रशासन आणि महापालिका आयुक्तांना एक पत्र पाठवलं आहे. झालेला प्रकार गंभीर आहे, याची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून जबाबदार व्यक्तीवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी या पत्राद्वारे केली आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी की, एक आणि दोन जुलै रोजी या सहलीचं आयोजन करण्यात आलं होतं. या सहलीमध्ये इयत्ता तिसरी आणि चौथीचे १६० विद्यार्थी सहभागी झाले होते. ही सहल लोअर परळ येथे एका विज्ञान विषयक कार्यक्रमाला भेटीसाठी आयोजित करण्यात आली होती. या प्रवासादरम्यान शाळा प्रशासनाने ठरवून दिलेल्या ट्रॅव्हल्स कंपनीकडून विद्यार्थ्यांच्या अल्पोपहार आणि भोजनाची सोय करण्यात आली होती. मात्र हा आहार घेतल्यानंतर सहलीत सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांना अस्वस्थ वाटू लागलं, ५५ ते ६० विद्यार्थ्यांना उलट्या आणि जुलाबाचा तीव्र त्रास होऊ लागला. विद्यार्थ्यांना त्रास सुरू झाल्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं, अचानक घडलेल्या या घटनेमुळे पालक वर्गात चांगलीच घबराट आणि

पान २ वर »

जळगांव 0257 - 2237491, 9422775011, 8999256713 | ठाणे -मुंबई - 9422284511 | नाशिक-9890525925 | पुणे - 9209832828 | lokshahilive@gmail.com, lokshahi@hotmail.com

## पान १ वरून

## बारा दिवसांनी नाल्यातून ...

गाडी अद्यापही नाल्याच्या पाण्यातच अडकेलेली आहे. ती गाडी बाहेर काढण्यासाठी आणखी वेळ लागणार आहे. तसेच, वाहून गेलेल्या तीन दुचाकींचा अद्याप कोणताही थांगपत्ता लागलेला नाही. पुराच्या वेळी पाण्याचा वेग किती प्रचंड होता, याचा हा जिवंत पुरावा आहे. वाहनाची झालेली ही दयनीय अवस्था पाहता त्या दिवशी वाघराळपाड्यात पुराने किती भीषण तांडव माजवले होते, याची पुन्हा एकदा प्रचिती येत आहे. आता गाडीचे झालेले हे १०० टक्के नुकसान पाहता, वाहन मालकाला विमा कंपनीकडून नेमकी किती भरपाई मिळणार, हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## राम मंदिरातील देणगी चोरी...

लिहिलंय, 'प्रामाणिक व्यक्तीची सर्वांत मोठी संपत्ती म्हणजे त्याची निर्भयता. ज्याच्या मनात चोर नसतो, तो कधीही मान झुकवत नाही.' इतकंच नाही तर त्यानंतर अनुपम खेर यांनी आणखी एक भलीमोठी पोस्ट शेअर केली आहे. त्यात म्हटलंय, 'लोकप्रिय असणं चांगलं वाटतं. पण प्रत्येकाचं आवडतं बनण्याच्या प्रयत्नात आपण अनेकदा स्वत:पासून दूर जातो. स्वत:च्या नजरेत एक चांगला माणूस म्हणून राहणं ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे, हे मी शिकलोय. बाकीच्या जगाची मतं काळानुसार बदलतात. तुमच्या जगात खरोखर किती लोकं महत्त्वाची आहेत? कधीतरी याचा विचार करा. संपूर्ण जगात लोकप्रिय होण्याचा प्रयत्न करू नका. ते गरजेचंही नाही आणि योग्यही नाही.' अनुपम खेर यांनी या पोस्टमध्ये कोणाचंही नाव घेतलं नाही, पण सोशल मीडियावरील टीकाकारांना त्यांनी याद्वारे प्रत्युत्तर दिल्याचं म्हटलं जात आहे. त्यांच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनुपम खेर हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप पक्षाचं खुलेपणाने समर्थन करताना दिसतात. मात्र राम मंदिरातील देणगीच्या चोरीबाबत त्यांनी असं वक्तव्य करायला नको होतं, असं मत नेटकऱ्यांनी मांडलं आहे.

## प्रत्येक बाबतीत खोटं बोलून...

अनेक धक्कादायक आरोप केले आहेत. २०१७ ते २०१८ पर्यंत गितेश आणि आपल्यात कुठलेच शारिरीक संबंध नव्हते. गितेशची शारीरिक अक्षमता लपवण्यासाठी अघोरी कृत्य केल्याचा आरोप गिरीजा राऊतांनी केला. दरम्यान, गिरीजा राऊतांचे सगळे आरोप विनायक राऊतांनी फेटाळून लावले. मी आणि माझ्या कुटुंबीयांवर लावलेले आरोप खोटे आहेत. गेल्या तीन वर्षांपासून गितेश आणि गिरीजा एकत्र राहत नाहीत. २०१८ मध्ये घटना घडली असे सांगते आणि २०२६ मध्ये त्याची तक्रार करत आहेत. यातंच काही काळं आहे. प्रत्येक वेळी तिचे आई-वडील तिच्यासोबत होते. सध्या त्यांची घटस्फोट केस सुरू आहे, अशी माहिती विनायक राऊतांनी दिली. या नोटिशीमध्ये दर महिन्याला खर्चासाठी ५ लाख द्यावे, अशी मागणीही गिरीजा राऊत यांनी केली होती. याशिवाय १० कोटींची अधिक रक्कम द्यावी. मानसिक नुकसान भरपाई २ कोटी द्यावी, अशी मागणी गिरीजा राऊत यांनी केली आहे. ५ रूमचं घर आणि ऑटोमॅटीक गाडी मागितली आहे. या मागण्या पूर्ण होत नाहीत, म्हटल्यावर तिने तक्रार केली, असा दावा विनायक राऊतांनी केला. आम्ही अघोरी उपचारांच्या आरोपांचे पूर्ण खंडन करतो. आम्ही त्या पंथातले नाही. आई-वडील समोर असताना तेव्हा तक्रार केली नाही. या संदर्भात आम्ही न्यायालयात गेलो आहोत, असं विनायक राऊत म्हणाले. आता गिरीजाच्या आई पूजा पवार यांनी महत्वाची माहिती समोर आणली आहे. आम्ही विनायक राऊतांच्याही अटकेची मागणी करत आहोत. आज विनायक राऊत आरोप करत आहेत. टेरेस फ्लॅट मागितला ५ लाख मागितले. मूळात आम्ही मिटिंगसाठी वेळ मागत होतो. विनायक राऊतांच्या घराची मुलगी आहे, आरोप करताना विचार करावा. मुलगी माहेरी आल्यापासून आम्ही मिटिंगसाठी वेळ मागत आहोत. आम्ही ३ वर्षे गाठीभेटीसाठी वेळ मागत होतो. आपला मुलगा काय करतो हे त्यांना माहिती आहे. विनायक राऊत यांचा मुलगा घाणेरड्या शिव्या देतो. मानसिक त्रास देतो. आमच्या मुलीचा गैरफायदा घेतला, असं गिरीजाच्या आई म्हणाल्या.

## गर्भवती महिलेला टाके...

उसवून पुन्हा घालण्याची शस्त्रक्रिया होणार होती. मात्र, येथील डॉक्टरांनी पोटातील इन्फेक्शन पूर्ण बरे झाल्याशिवाय टाके पुन्हा घालण्यास असमर्थता दर्शविल्याचे या महिलेने प्रसारमाध्यमाशी बोलताना सांगितले. येथील डॉक्टर आपल्याला म्हणाले की तुम्हाला टिटवाळा येथील डॉक्टरांनी सांगितले नाही का तुमच्या टाक्यात इन्फेक्शन आहे असे पीडीत महिलेने सांगितले. या पीडीत महिलेची आईने डॉक्टरांवर हलगर्जीचा आरोप केला आहे. माझी मुलीचे टाके अर्धवट काढून तसेच ठेवण्यात आले आहेत. रोज तिचे ड्रेसिंग सुरु असताना ती वेदनेने रडत असते. तिचे रडणे मी सहन करु शकत नाही, मी तिची आई आहे. या हलगर्जी करणाऱ्या डॉक्टरावर कारवाई करावी अशी मागणी या पीडीत महिलेच्या आईने केली आहे. नुकतेच शास्त्रीनगरच्या कल्याण-डोंबिवली येथील रुग्णालयात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी लहान बालकाला ॲडमिट करण्यास नकार दिल्याने डॉक्टरांना मारहाण केल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर विरोधकांनी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्या सह तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांची रवानगी सध्या पोलीस कोठडीत करण्यात आली आहे.

## क्रिकेट निवड चाचणीत ८८...

निवड चाचणीमध्ये निवड झालेल्या ८८ खेळाडूंची १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर दरम्यान विविध संघांमध्ये सामने खेळविले जाणार आहेत. हे सामने अनुभूती निवासी स्कूलच्या मैदानावर होतील. यातून अंतिम २५ खेळाडूंची निवड केली जाईल.

## अभिनेते पवन कल्याण...

दोन्ही खांद्यांची शस्त्रक्रिया एकत्र केल्यास रिकव्हरीच्या काळात जास्त त्रास होऊ शकतो. म्हणून सुमारे साडेतीन तास चाललेल्या या शस्त्रक्रियेत फक्त उजव्या खांद्यावरच उपचार करण्यात आले. डाव्या खांद्याची शस्त्रक्रिया सुमारे दोन महिन्यांच्या अंतराने केली जाणार आहे. दरम्यान, पवन कल्याण यांची प्रकृती जाणून घेण्यासाठी चंद्रबाबू नायडू हे कोकिलाबेन रुग्णालयात त्यांना भेटायला पोहोचले आहेत. पवन कल्याण हे दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील मोठे नाव आहे. त्यांनी आतापर्यंत अनेक प्रसिद्ध चित्रपटांत काम केलेलं असून त्यांचे लाखोंनी चाते आहेत. प्रसिद्ध अभिनेता चिरंजीवी यांचे ते छोटे भाऊ आहेत. अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक अशा वेगवेगळ्या भूमिकांमधून त्यांनी कमाल करून दाखवलेली आहे. त्यांचा जन्म आंध्र प्रदेशातील आहे. सिनेसृष्टीत नाव कमावल्यानंतर आता ते राजकारणात सक्रीय आहेत. २००८ सालापासून ते आंध्र प्रदेशातील राजकारणातील ते प्रमुख चेहरा आहेत. २०१४ साली त्यांनी स्वत:चा पक्ष स्थापन केला. जनसेवा पक्ष असे त्यांच्या पक्षाचे नाव आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य अश्वारूढ स्मारक उभारण्याची कृती समितीची मागणी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** प्रतिनिधी

यावल तालुक्यातील किनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य अश्वारूढ स्मारक उभारण्याचा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर आता तालुक्याचे मुख्यालय असलेल्या यावल शहरातही छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य अश्वारूढ स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक कृती समिती, किनगाव यांच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन समितीचे अध्यक्ष मोहन रमेश पाटील यांच्या पुढाकारातून यावल-रावेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल जावळे यांना सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, यावल हे तालुक्याचे मुख्यालय असूनही शहरात आजपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य अश्वारूढ स्मारक उभारण्यात आलेले नाही. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हे केवळ ऐतिहासिक स्मरणचिन्ह नसून भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल. त्यामुळे शहरातील मध्यवर्ती व योग्य ठिकाणी भव्य स्मारक उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून संबंधित विभागामार्फत तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी आमदार अमोल जावळे यांनी निवेदनाची सकारात्मक दखल घेत या विषयाचा आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. तसेच यावलच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा छायाताई पाटील यांनाही समितीने निवेदन दिले असून त्यांनीही स्मारक उभारणीसाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले. या प्रसंगी मोहन पाटील, पंकज हिवराळे, आर. जी. पाटील, विनोदकुमार पाटील उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी स्मारक उभारणीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

# जिपीएस मित्र परिवाराच्या भव्य नेत्र शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाळधी** प्रतिनिधी



सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मा. ना. गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील व युवा उद्योजक विक्रम पाटील यांच्या पुढाकारातून जिपीएस मित्र परिवारातर्फे आयोजित करण्यात आलेल्या भव्य नेत्र तपासणी व मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला रविवारी नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. पहाटेपासूनच शिबिरस्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी सात वाजल्यापासून नोंदणीला सुरुवात झाली. दिवसभरात एकूण ४६० रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या तपासणीनंतर १७० रुग्णांची मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, या सर्व रुग्णांना अत्याधुनिक सुविधा असलेल्या पनवेल येथील शंकरा नेत्र रुग्णालयात मोफत शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. शिबिरात रुग्णांच्या नोंदणीपासून नेत्रतपासणी, निदान, औषधोपचार, शस्त्रक्रियेसाठी निवड आणि पुढील उपचारांची संपूर्ण प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग रुग्णांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. तसेच सर्व उपस्थितांसाठी नाश्ता व जेवणाची विनामूल्य सोय करण्यात आली. संपूर्ण सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिल्याने नागरिकांनी आयोजकांचे मनापासून कौतुक केले. 'दृष्टीदान' हा उपक्रम अनेक गरजू कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरत असून, मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रियेच्या माध्यमातून अनेकांना पुन्हा स्पष्ट दृष्टी मिळणार आहे. शिबिरातून लाभ घेतलेल्या रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी गुलाबराव पाटील, प्रतापराव पाटील, विक्रम पाटील तसेच जिपीएस मित्र परिवाराचे आभार मानत या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी शंकरा नेत्र रुग्णालयाची तज्ज्ञ वैद्यकीय टीम, डॉ. राहुल चौधरी, डॉ. विजय ब्राम्हणे, डॉ. मोहसीन सय्यद, डॉ. गुरुनाथ घोटे, पाळधी व चांदसर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी, तसेच जिपीएस मित्र परिवार, शिवसेना आणि युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिवसभर अथक परिश्रम घेतले.

## ..तर पुन्हा ममता बॅनर्जी...

झाले.एकीकडे बंडखोर गटाकडून पक्ष ताब्यात घेण्याच्या जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत, मात्र असं असतानाच आता रवींद्रनाथ घोष यांनी हे मोठं विधान केलं आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात बंडखोर गटामध्ये देखील दोन गट पडणार का? हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे. तसेच ममता बॅनर्जी या आता अभिषेक बॅनर्जींबद्दल काय निर्णय घेणार हे देखील पहावं लागणार आहे.

## सहलीला गेलेल्या..

चिंतेचं वातावरण निर्माण झालं. दरम्यान या घटनेनंतर तुमच्या मुलाची रोगप्रतिकारक शक्ती कमी आहे, असं पालकांना सांगून हे प्रकरण दाबण्याचा शाळा प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा देखील दबक्या आवाजात सुरू आहे, अशी माहिती समोर आली आहे. दरम्यान दोन जुलै रोजी या सहलीचं आयोजन करण्यात आलं होतं. सहलीवरून परतल्यानंतर काही विद्यार्थ्यांना फूड पॉइझनिंगचा त्रास झाल्याने त्यांना ज्युपिटर हॉस्पिटल,ठाणे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांना बसमध्ये देण्यात आलेल्या स्नॅक्समुळे ही समस्या उद्भवल्याचा आरोप केला जात आहे. संबंधित घटनेची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य समोर येणे आवश्यक असल्याची मागणी आता पालक वर्गातून सुद्धा होत आहे. ज्या ट्रॅव्हल कंपनीवर या विद्यार्थ्यांना अल्पोपहार आणि भोजनाची व्यवस्था करण्याची जबाबदारी होती, त्याच ट्रॅव्हल कंपनीचे नाव काही वर्षांपूर्वी एका विद्यार्थिनीशी संबंधित गंभीर प्रकरणातही चर्चेत आले होते. त्या घटनेनंतर अनेक शाळांनी या कंपनीसोबतचे व्यवहार बंद केल्याची चर्चा होती.

## डिलिव्हरी एजंटकडून तरुणीशी अश्लील वर्तन

**बेंगळुरू–** ऑनलाइन शॉपिंग आणि घरपोच सेवा आता दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनल्या आहेत. देशभरात लाखो डिलिव्हरी एजंट प्रामाणिकपणे सेवा देत असले, तरी काही डिलिव्हरी एजंटमुळे महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. अलीकडेच बेंगळुरूमध्ये घडलेल्या एका घटनेने याबाबत चिंता वाढवली आहे. बेंगळुरूच्या मराठाहल्ली परिसरात एका महिलेने फ्लिपकार्टच्या डिलिव्हरी एजंटवर गंभीर आरोप केले आहेत. महिलेच्या तक्रारीनुसार, डिलिव्हरी एजंटने वारंवार नकार देऊनही तिच्या घरात जबरदस्तीने घुसला. त्याने वॉशरुम वापरण्याची विनंती केली आणि बाहेर आल्यानंतर तिच्यासमोर अश्लील कृत्य करत गुप्तांग उघडे केल्याचा आरोप आहे.

## BRIEF TENDER NOTICE

### NOTICE INVITING E-TENDER NO.1/2026-27

Sarpanch/VDO/Gramsevak, Village Panchayat Dist. Jalgaon.(MS)as mention below invites online Item rate tender for Various Construction Material or percentage rate from registered suppliers or contractor in behalf of Dy.Chief Executive Officer (V.P.) Zilla Parishad, Jalgaon.

| Sr No | Village Panchayat | Name of Work | EMD | Tender Fee | Estimated Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Ozar | Construction Of Cement Concrete At Ozar Ta Chalisgaon Dist Jalgaon | 5,00/- | 4,992/- | 4,99,175/- |
| 2 | Ozar | Construction Of Urinal At Ozar Ta Chalisgaon Dist Jalgaon | 2,00/- | 1,498/- | 1,49,796/- |
| 3 | Ozar | Construction Of Cement Concrete At Ozar Ta Chalisgaon Dist Jalgaon | 3,00/- | 2,800/- | 2,79,959/- |
| 4 | Ozar | Construction Of R.C.C. Gutter At Ozar Ta Chalisgaon Dist Jalgaon | 5,00/- | 4,998/- | 4,99,766/- |
| 5 | Ozar | Construction Of R.C.C. Gutter At Ozar Ta Chalisgaon Dist Jalgaon | 2,00/- | 1,400/- | 1,40,000/- |
| 6 | Dahiwad | Spply for use in soild waste management Tractor Troly Under 15 Finance Commission AT Dahiwad Tal Chalisgaon Dist Jalgaon | 3,00/- | 3,000/- | 3,00,000/- |

**General Terms and Condition-**

1. The complete bidding process will be **online (E-tendering)**
**All the notifications / Corrigendum and changes regarding this tender notice hereafter will be published online on website http://mahatenders.gov.in**
2. **Bidding document for work can be seen and downloaded from the website "http://mahatenders.gov.in" from 09:00 hours on Dt 13/07/2026 to Dt 20/07/2026 up to 17:00**
3. **The bid can be submitted in elctronic format on the website "http://mahatenders.gov.in" for work " from 09:00 hours on Dt 13/07/2026 to Dt 20/07/2026 up to 17:00**
4. **Technical Bid will be opened for work on Dt 22/07/2026 at 09:00 hours on website http://mahatenders.gov.in" in the Office of the Village Panchayat respectively Dist. Jalgaon**
5. The guidelines to download the tender document and online submission of bids and Procedure of tender opening can be downloaded from website http://mahatenders.gov.in

**ग्रामसेवक/सरपंच,**
**ग्रामपंचायत कार्यालय**
**जि जळगाव**

### Change In name

I have change of my old name from **Shaikh Kalim Shaikh Gulam Rasul** To **Shaikhk Kalim Shaikh Gulamrasul maniyar** my new name as per my ducements Documents

### Change In name

I have change of my old name from **Aafreen Rajik Patel** To **Saida Rajik Patel** my new name as the per my ducements Documents

## पुन्हा तरुणांच्या आंदोलनाचा भडका

**काठमांडू –** नेपाळमध्ये आंदोलनाचा भडका उडाला आहे. गेल्या तीन दिवसांत तीन जणांना आत्मदहन करण्याचा प्रयत्न केलाय. त्यापैकी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर एक जण गंभीररित्या भाजला गेलाय. विशेष म्हणजे नव्यानं पंतप्रधान बनलेल्या बलेंद्र शाह यांच्याविरुद्धात आंदोलन केले जात असून तरुणांमध्ये त्याच्याविरुद्धात संतापाचा लाट उसळू लागली आहे. इतकेच नाही तर बालेन शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली जातेय. नेपाळची राजधानी काठमांडूमध्ये तरुण आंदोलन करत आहेत, तर विरोधी पक्ष नेपाळी काँग्रेसने सरकारवर तरुणांमध्ये आशा आणि आत्मविश्वास निर्माण करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केलाय. झेन-जी नेपाळ संघटनेने पंतप्रधान बालेन शाह यांच्यावर जनविरोधी आणि हुकूमशाही पद्धतीने शासन केल्याचा आरोप केला आहे. संघटनेच्या मतानुसार तरुणांचा रोजगार आणि उत्पन्न वाढवण्यासाठी अर्थसंकल्प आणि धोरणांमध्ये कोणतीही ठोस पावले उचलली गेली.

## निधन वार्ता

### मायाबाई बोदडे



**मुक्ताईनगर :** मुकेश राजू बोदडे व अर्जुन राजू बोदडे यांची आई मायाबाई राजू बोदडे यांचे दि. ११ रोजी संध्याकाळी ४:३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले असून त्यांची अंत्ययात्रा त्यांचे राहते घर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर मुक्ताईनगर येथून निघाली.

### श्यामकुमार पाटील



**मनवेल ता. यावल :** मनवेल येथील रहिवासी व साकळी-शिरसाड माध्यमिक विद्यालयातील उपशिक्षक श्याम कुमार हुकूमचद पाटील (वय ५६) यांचे दिनांक ११ जुलै रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक मुलगा, पत्नी असा परिवार आहे. जळगाव येथील मनःशांती हॉस्पिटलचे डॉक्टर उदयसिंग पाटील व योगराज पाटील यांचे पुतणे व पंचायत समिती माजी सदस्य दीपक पाटील, पन्नालाल पाटील, गोरख पाटील यांचे भाऊ तर कृणाल पाटील यांचे वडील होते.

### Change of Name

OLD NAME
**SHETH SOURABH KISHOR**
NEW NAME
**SOURABH KISHOR KUMAR SHETH**
YOGESHWAR NAGAR JALGAON

### Change In name

I have changed my name from **"QAZI UMERA BI SALEEMODDIN"** (Old name) To **"HUMEERA NAAZ SHAIKH SHADAB ANWAR"** (New name) as per documents for all purpose.

### CHANGE OF NAME

I, Named below declares that I have changed my old name from MO SAQUIB MO RAFIQUE BAGWAAN To my new name as MO SAKIB MO RAFIK BAGWAN As per annex and all documents.

### CHANGE OF NAME

I, Named below declares that I have changed my old name from SHAIKH MOHAMMED IMTIYAZ MOHAMMED NISAR To my new name as MOHAMMAD IMTIYAZ MOHAMMAD NISAR BAGWAN As per annex and all documents.

### CHANGE OF NAME

I, Named below declares that I have changed my old name from PRADIPKUMAR LILADHAR ZAMBARE To my new name as PRADIP LILADHAR ZAMBRE As per annex and all documents.

### जाहिर नोटिस

**ॲड.सौ.कृतिका.ज.आफ्रे**
**ॲडव्होकेट, शेलार नगर, पारोळा**
**ता. पारोळा जि. जळगांव**
**मोबा.७५०७५३७६७७**
**दिनांक– १३/०७/२०२६**

तमाम जनतेस व सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था इत्यादी यांना आमचे पक्षकार श्री. श्रीकांत अभय परांजपे, रा. धुळे ता.जि. धुळे (महाराष्ट्र) यांच्याकडून सदर जाहीर नोटीस अन्वये कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णनः १) तु.जि. जळगांव पो. तु. ता. पारोळा पैकी मौजे दबापिंप्री ता. पारोळा शिवारातील श्री. विजय शंकर भागवत यांच्या मालकीचा गट नं. ७९, क्षेत्र– ००.५४ आर. आकार रु. २.८२ पैसे यांसी चतु:सीमा... पुर्वेस शिव रस्ता भोकरबारी, पश्चिमेस रतन शामराव पाटील यांचे क्षेत्र, उत्तरेस – प्रकाश किसन पाटील यांचे क्षेत्र, दक्षिणेस शिव रस्ता भोकरबारी व २) तु.जि. जळगांव पो. तु.ता. पारोळा पैकी मौजे दबापिंप्री ता. पारोळा शिवारातील श्री. रतन शामराव पाटील यांच्या मालकीचा गट नं. ७९, क्षेत्र– ००.९० आर. आकार रु. ३.५३ पैसे यास चतु:सीमा... पुर्वेस विजय शंकर भागवत यांचे क्षेत्र, पश्चिमेस सुमित प्रकाशराव दातेराव यांचे क्षेत्र, उत्तरेस प्रकाश किसन पाटील यांचे क्षेत्र, दक्षिणेस शिव रस्ता भोकरबारी येणेप्रमाणे चतुः सिमेतील ह्या मिळकती १) श्री. विजय शंकर भागवत व २) श्री. रतन शामराव पाटील, दोघे रा. रत्नापिंप्री ता. पारोळा ता. पारोळा जि. जळगांव यांचे मालकी व कब्जे उपभोगातील आहे.

२) वर वर्णन केलेली येणेप्रमाणे चतुः सीमेतील एकाच गटातील दोन मिळकती या आमचे अशिलांना कायम खरेदीने विकत घ्यावयाच्या असून त्यापोटी सौदापावती केलेली असून म. दुय्यम निबंधक सो. पारोळा यांचेसमोर खरेदीखत करावयाचे आहे. सदरची मिळकत ही वर नमुद केलेले व्यक्तीचे मालकीची प्रत्यक्ष कब्जात असून कोणत्याही प्रकारचे तक्रारीत, कर्ज प्रकरणात, जामिनकीत, नुकसानीत, वारस हक्क, अडचणीत नसून ती निर्वेध, बोजे विरहीत क्लीयर मार्केटेबल टायटलची आज रोजी आहे. असा विश्वास व भरोसा वरील मालक असलेल्या इसमाने आमचे अशिलांना दिलेला आहे. त्यानुसार आमचे अशिल लवकरच खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

३) तरी सदर मिळकतीसंबंधी, मिळकतीचे हक्क संबंधी, बोजा, तारण, गहाण, जप्ती, जामीनकी, कर्ज प्रकरण, वारस हक्क, जागेच्या दिशा, सीमा व मोजमाप क्षेत्र वगैरे बाबत तक्रार अगर दावा वगैरे असल्यास खाली सही करणार यांना ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर समक्ष भेटून कागदपत्रे दाखवून समाधान करावे. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध बोजेरहित वगैरे आहे. असे समजून आमचे अशिल वरील मिळकतीचा सौदा पावती व खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर सदर मिळकतीबाबतचा कोणचीही कोणतीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व कागदपत्रांवरुन व सांगितले वरुन व दिलेल्या अधिकारान्वये आमचे मार्फत दिली असे.

**पारोळा जि. जळगांव**
**दिनांक :– १३/०७/२०२६**

**नोटीस देणारतर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. सौ. कृतिका ज. आफ्रे**

### वारसाबाबत जाहीर नोटीस

दगुबाई एकनाथ सुरवाडे रा. सावतर ता. भुसावळ जि. जळगांव यांनी तहसिलदार भुसावळ यांचेकडेस वारस दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे. सदर अर्जानुसार मयत एकनाथ मोहन सुरवाडे हे दि. ३१/०५/२०१८ रोजी मयत झालेले असनू ते पाटबंधारे उपविभाग सावदा येथे मजुर या पदावर काम करीत होते. त्यांचे मृत्यूपश्चात पेंशनकामी वारस दाखल्याची मागणी दगुबाई एकनाथ सुरवाडे यांनी केलेली आहे. मयत एकनाथ मोहन सुरवाडे यांना खालील प्रमाणे वारस आहेत.

| अ.नं. | नांव | नाते | वय |
|---|---|---|---|
| १. | दगुबाई एकनाथ सुरवाडे | पत्नी | ६१ |
| २. | रविंद्र एकनाथ ढिवर | मुलगा | ४० |
| ३. | संजय एकनाथ सुरवाडे | मुलगा | ३४ |
| ४. | कल्पनाबाई गोपाळ ठाकरे | मुलगी | ४२ |
| ५. | दुर्गाबाई बाळु माळे | मुलगी | ३६ |
| ६. | कविताबाई विठ्ठल नावडी | मुलगी | ३५ |

वर प्रमाणे मयत एकनाथ मोहन सुरवाडे यांना एकुण ६ वारस आहेत. या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही. वरील वारसांव्यतिरिक्त मयतास इतर अन्य कोणी वारस असल्यास किंवा सदर वारसांबाबत कोणाचा काही आक्षेप, हरकत किंवा तक्रार असल्यास तहसिलदार भुसावळ यांचेशी संपर्क साधावा.

**कळावे**

### जाहिर नोटिस

भडगांव येथील में दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो यांचे न्यायालयात

**दिवाणी कि अर्ज नं. ५६/२०२६**
**चौकशी ता. १३/०८/२०२६**

अर्जदार...१. सतिष मनोहर परदेशी, उ.व. ४९ वर्षे, धंदा-नोकरी, रा. एकविरानगर, भाग-२, बाळद रोड, भडगांव, ता. मडगांव, जि. जळगांव २.मंजुळाबाई प्रतापसिंग परदेशी, उ.व.५६ वर्षे धंदा घरकाम, द्वारा-प्रतापसिंग शंकरसिंग परदेशी, रा. श्रमिक नगर, नाशिक, ता.जि. नाशिक ३. उषाबाई मंगलसिंग राजपुत, उ.व.-५३ वर्षे, धंदा घरकाम, द्वारा-मंगलसिंग इंदलसिंग राजपुत, रा. मोहाडी, ता. जि. जळगांव ४ सुशिलाबाई नंदलाल परदेशी (मयत दिनांक-११.०२.२०२१) मयतास वारस मुले-२. मुली- ४अ . दिपक नंदलाल परदेशी, उ.व.३५ वर्षे, धंदा-शेती. ४ ब . दिनेश नंदलाल परदेशी, उ.व. ३१ वर्षे, घंदा शेती ४३३ व ४ब राहणार- हिसाळे, ता. शिरपुर, जि. धुळे. ४.क. चंदाबाई बापु परदेशी, उ.व. ३८ वर्षे, घदा-घरकाम, द्वारा बापु रामलाल परदेशी, रा. बाबरूड, ता. भडगांव, जि. जळगाव ४.ड. सोनीबाई संग्रामसिंग परदेशी, उ.व.-३४ वर्षे, चंदा घरकाम, द्वारा-संग्रामसिंग विठ्ठल परदेशी, रा. गोंडखेड, ता जामनेर, जि. जळगाव...विरुद्ध...सामनेवाला...कुणीही नाही

बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट २ व ३ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज

ज्याअर्थी, अर्जदार न १ ते ३ चे वडील व अर्जदार न ४३ ते ४ड यांचे आजोचा नामे- मनोहर दगडू परदेशी हे दिनांक २१.०७.२०२२ रोजी मौजे भडगांव, ता. नडगांव, जि. जळगांव येथे मयत झालेले आहेत, त्यानंतर मयत मनोहर दगडू परदेशी यांच्या पत्नी नामे-मिराबाई मनोहर परदेशी हया दिनांक-०५.१०.२०२५ रोजी मौजे भडगांव, ता. भडगाव, जि. जळगांव येथे मयत झालेल्या आहेत.

मयत मनोहर दगडू परदेशी याना मुलगा व मुली ३ यापैकी १ मयत असे वारस आहेत अर्जदार न १ ते ३ आणि अर्जदार नं ४अ ते ४ड यांचे आजोबा नामे मनोहर दगडू परदेशी हे मयत झाल्यानंतर त्याना वारसदार म्हणून पत्नी-मिराबाई मनोहर परदेशी हया मयत असुन, अर्जदार न १ हा मुलगा व अर्जदार नं २ ते ४ हया मुली असून यापैकी अर्जदार नं ४ नागे सुशिलाबाई नंदलाल परदेशी ही मौजे हिसाळे, ता. शिरपूर, जि. धुळे येथे मयत झालेली आहे. तिचे ममतानंतर तिला अर्जदार नं ४अ ते ४ड हे मुले मुली असुन ते मयत मनोहर दगडू परदेशी यांचे नातु आहेत. अर्जदार यांनी मयत-मनोहर दगडू परदेशी आणि त्यांची पत्नी नामे मिराबाई मनोहर परदेशी यांची नगरपरिषद भडगांव येथे दप्तरी मृत्यूची नोंद केली असून त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र अर्जदार यानी त्तिलेले असून ते या अर्जासोबत दाखल केलेले आहे. व तसेच अर्जदार नं ४ नामे मयत-सुशिलाबाई नंदलाल परदेशी हिची ग्रा.पं. हिसाळे, ता. शिरपूर, जि. पुळे येथे ग्रा.प. दप्तरी मृत्यूची नोंद केलेली असुन तिचे मृत्यू प्रमाणपत्र अर्जदार यांनी घेतलेले असुन ते या अर्जासोबत जोडलेले आहे.

मयत मनोहर दगडू परदेशी यांचे मृत्यूनंतर शासकीय व निम शासकीय कामाकरीता अर्जदार नं १ ते ३ आणि अर्जदा ४३ ते ४ड यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी भडगांव नगरपरिषद कार्यालयात जाउन वारस दाखल्याची मागणी केली असता त्यानी मे. कोर्टातुन वारस दाखला आणण्याबाबत तोंडी कळविले. म्हणून अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग झाले आहे.

मयत मनोहर दगडू परदेशी यांनी त्यांचे हयातीत कोणतेही मृत्यूपत्र केलेले नाही. तसेच वरीलप्रमाणे अर्जदार नं १ ते ३ आणि अर्जदार नं ४अ ते ४६ हेच मयताचे वारसदास आहेत व इतर कोणीही मयतास वारस नाही. म्हणून में. कोटनि अर्जदार न १ ते ३ आणि अर्जदार नं ४अ ते ४८ यांचे नांवाने वारस दाखला दिल्यास कोणतीही बाधा येणार नाही.

तरी वरील अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकामी में. मडगांव न्यायालयात बॉम्बे रेग्यूलेशन कलम २ व ३ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. तरी त्याबाबत कोणाचीही काहीएक हरकत असल्यास त्यानी या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत भडगांव कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात. अन्यथा कोणावीही काहीएक हरकत नाही असे समजुन पुढील योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील.

आज तारीख ०४/०७/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व आमच्या सहीनिशी दिले.

**कनिष्ठ लिपिक**

**हुकुमावरून**
**सहा.अधिक्षक,**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय,**
**भडगांव जि. जळगांव**

लोकशाही दैनिक हे लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे असून त्यांच्या वतीने मुद्रक आणि संपादक शांता कमलाकर वाणी, प्रकाशक राजेश कमलाकर यावलकर यांनी लोकशाही ऑफसेट एम-१६९ , एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
Lokshahi Dainik is owned by Lokshahi Innovations Private Limited and is Printed by the Printer and Editor - Shanta Kamlakar Wani Publisher - Rajesh Kamlakar Yawalkar, at Lokshahi Offset M-169, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra) and published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra. आर.एन.आय.नं MAHMAR/2009/33028 पोस्टल रजी. नंबर No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८. संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.

लोकशाही
संपादकीय

## दीपनगरमध्ये कामात भ्रष्टाचार एक अधिकारी निलंबित

जळगाव जिल्ह्यातील भुसावळ नजीक असलेल्या दीपनगर औष्णिक विद्युत केंद्रात काम न करताच कामाची बिले काढल्या प्रकरणी एक अधिकारी नामे इंगळे यांना निलंबित करण्यात आले असून, चीफ इंजिनिअर यांची बदली करण्यात आली आहे. एकूण ७०० कोटी रुपयांची कामे केल्याचे दाखविण्यात आले असून, त्यापैकी ३०० कोटींचे काम झाले असल्याचे दिसून आले. हे प्रकरण विधान परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे यांनी पुराव्यानिशी मांडले होते. त्या प्रकरणात अधिकारी इंगळे यांना तातडीने निलंबित करण्यात आले आहे. दुसरे म्हणजे, दीपनगर औष्णिक विद्युत केंद्राच्या कर्मचाऱ्यांच्या कॉर्टरमध्ये काम अत्यंत निकृष्ट पद्धतीने झाले असून, त्यामध्ये सिमेंट, लोखंड आदी सर्व निकृष्ट प्रकारचे वापरण्यात आले आहे. त्या प्रकरणे सुद्धा अधिकारी रडारवर असून, त्यांची चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अंतिम अनेक अधिकारी निलंबित होण्याची दाट शक्यता आहे. कामे न करता बिले काढणे म्हणजे काहीच काम झालेले नसताना बिले काढणे, हा तर अजबच प्रकार म्हटला पाहिजे. अलीकडे काम निकृष्ट दर्जाचे करून त्यात भ्रष्टाचार केल्याचे ऐकिवात आहे; पण काम न करता करताच बिल काढायची अधिकाऱ्यांची हिंमतच म्हटली पाहिजे. त्या अधिकाऱ्यांच्या हिमतीला दाद दिली पाहिजे. त्याला कोणती कोणाचा आशीर्वाद असल्याशिवाय हे शक्य नाही, असे म्हणतात ते खरे आहे. या औष्णिक विद्युत केंद्राचे चीफ इंजिनियर हे त्या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या पाठीशी होते किंवा आहेत. त्यावरून त्यांची बदली करण्यात आली आहे. ''आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय,'' असं जे म्हणतात, ते येथे तंतोतंत लागू पडते. राज्य शासनाचा हा प्रकल्प असला तरी, राज्यात किती प्रकारे कमिशन दिले जाते, ते देखील पाहिले पाहिजे. त्याशिवाय असे काम न करता बिल काढण्याचा प्रकार होणे शक्य नाही. प्रथम दर्शनी चीफ इंजिनियर यांची भागीदारी असते. तशी भागीदारी असल्याशिवाय अशा प्रकारची कामे होणे शक्य नाही. चीफ इंजिनिअरच्या भागीदारी मधून राज्य शासनाकडे त्याचा वाटा जातो. त्यानंतर चीफ इंजिनियरचा वाटा येतो. त्यानंतर संबंधित बिल काढणारा अधिकारी याचा वाटा असतो. म्हणजे, आपण सारे मिळून गुपचूप खाऊया, अशातला हा प्रकार आहे. म्हणजे काय, काही काम न करता बिले काढणे, याच्या हिमतीला दाद दिली पाहिजे. परंतु कोणीतरी कर्दनकाळ आपल्यावर नजर ठेवून असतो, हे त्या लक्षात येत नाही. सर्वाधिक पैसा हा आपल्याच बापाचा समजून त्यांची वेगळी विल्हेवाट लावायची, हा प्रकार एकनाथ खडसे यांनी उघडकीस आणला आणि तो विधान परिषदेत मांडण्यात आल्या नेत्यांचे धाबे दणाणले. अधिकारी इंगळे निलंबित झाला. आणखीन काही अधिकारी निलंबित होतील. चीफ इंजिनिअर यांची बदली झालीच आहे. दुसरा भ्रष्टाचार म्हणजे, दीपनगर औष्णिक विद्युत केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या क्वार्टरच्या कामात निकृष्टपणा. हाही या कामातही संबंधित अधिकाऱ्यांना कामात निकृ ष्ट कमालीचा निकृष्टपणा केला आहे. याप्रकरणी अनेक अधिकारी रडारवर असून, त्यांची चौकशी होते आहे. या निकृष्ट कामां बाबीतही एकनाथ खडसे यांनी पुराव्यानिशी विधान परिषदेत प्रश्न मांडला. त्या प्रकरणात अनेक अधिकाऱ्यांची चौकशी सुरू झाली असून, त्यांना निलंबित करण्यात येईल असे दिसते. एकंदरीत आपल्याच कर्मचाऱ्यांच्या कॉर्टरचे काम निकृष्टपणे करून, त्यांचा त्याच्यात वारमा भ्रष्टाचार करायचा आणि पैसे उकळायचे, हा एक जणू अधिकाऱ्यांचा धंदा झाला आहे. अशा अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांना निलंबित नव्हे, तर त्यांना बडतर्फ केल्याशिवाय त्यांना धडा मिळणार नाही. अन्यथा एक गेला की दुसरा येईल आणि तो तशाच प्रकारचा भ्रष्टाचार करत राहील. त्यासाठी बरखास्त करणे, हा एकच उपाय आहे.

## मुख्यमंत्री बदलाचे वारे!

सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे केंद्रात जाणे, यावर अधूनमधून चर्चा होत असते. त्याला शिवसेनेचे आमदार बच्चू कडू हे देखील कारणीभूत आहेत. देवेंद्र फडणवीस हे केंद्रात जावे आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत, असे आमदार बच्चू कडू हे वारंवार बोलत असतात. त्यालाच उत्तर देताना भाजपचे नेते म्हणतात की, २०१९ पर्यंत देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री राहतील. त्यानंतर एक विषय असाही येतो की, देवेंद्र फडणवीस केंद्रात गेले तर त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची शिफारस मुख्यमंत्री होण्यासाठी करतील, असे बोलले जाते. आता आणखीन एक नवा ट्विस्ट. राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे यांची भाजपमध्ये घर वापसी चालली आहे. ते म्हणतात की, चंद्रकांत बावनकुळे मुख्यमंत्री होतील ना, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होतील. देवेंद्र फडणवीस यांनी गिरीश महाजन यांची शिफारस करतील, असे वक्तव्य करून जोरदार हल्लाबोल केला आहे. एकनाथ खडसे यांचा विनोद तावडे यांनी भेट घेतली. त्यातच या भाजप घरवापसीला जोर चढला आहे. परंतु खडसे हे म्हणतात की, माजी आता भाजपमध्ये येण्याची बिलकुल इच्छा नाही. भले माझे कार्यकर्ते म्हणतात, मी भाजपमध्ये प्रवेश करावा; पण मी प्रवेश नाही केला तरी माझे कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करतील. परंतु मी मात्र शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबरोबरच राहणार आहे. शरद पवारांसोबतच मी राहणार आहे, हे त्यांनी आज स्पष्टपणे सांगून टाकले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या दोन सप्टेंबरच्या वाढदिवसानिमित्त निमंत्रण देण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांच्या मातोश्रीवर जाऊन त्यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलताना म्हणाले की, आमची ही भेट माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने झाली होती. त्यांना मी निमंत्रण दिले. ते वाढदिवसाच्या कार्यक्रमाला येणार आहेत. यावेळी खासदार संजय राऊत सुद्धा तेथे हजर होते. एकंदरीत नाथाभाऊंच्या घर वापसीवरून परत एकदा वादळ उठले आहे. बघूया काय होते ते...

# सामाजिक कामाबरोबर त्याचा दीर्घकालीन चांगला परिणाम महत्त्वाचा

**डॉ. दीपक पुरोहित यांचे प्रतिपादन : रोटरी क्लब जळगावचे पदग्रहण उत्साहात**

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी




सामाजिक क्षेत्रात मोठे कार्य करण्याबरोबर लाभार्थींच्या जीवनात त्याचा दीर्घकालीन चांगला परिणाम होणे महत्त्वाचे आहे असे रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे माजी प्रांतपाल डॉ. दीपक पुरोहित यांनी प्रतिपादन केले. गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये झालेल्या रोटरी क्लब जळगावच्या ७७ व्या पदग्रहण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी सहप्रांतपाल अनिल कांकरिया यांची विशेष उपस्थिती होती. एक व्यक्ती पुढाकार घेऊन चांगल्या कार्याची सुरुवात करतो, त्यात अनेक व्यक्ती समूहाच्या रुपाने सहभागी होत मोठे कार्य उभे राहते असे डॉ. पुरोहित यांनी सांगून वर्सोवा बीच स्वच्छता अभियानासह अनेक उदाहरणे दिली. रोटरी क्लब जळगावच्या गेल्या वर्षाच्या कार्याचे कौतुक करून रोटरी इंटरनॅशनलची कार्यपद्धत व शिस्त या क्लबमध्ये जाणवते असे सांगून दिव्यांग - विशेष मुलांसाठी रोटरीच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक सहकार्यातून कायमस्वरूपी मोठे कार्य करावे असे त्यांनी सांगितले. त्यासाठी डॉ. पूरोहित यांनी पन्नास हजार रुपयांची देणगी घोषित केली. नूतन अध्यक्ष ॲड. हेमंत भंगाळे यांना गिरीश कुलकर्णी यांनी तर मानद सचिव स्वाती ढाके यांना सुभाष अमळनेरकर यांनी कॉलर, पिन देऊन पदभार दिला. गिरीश कुलकर्णी यांनी गेल्या वर्षी केलेल्या कार्याचा अहवाल सादर केला. ॲड. हेमंत भंगाळे यांनी आगामी कार्याची दिशा व संकल्प व्यक्त करून नवीन कार्यकारिणीची घोषणा केली. प्रांतपालांचा संदेश अनिल कांकरिया यांनी सादर केला. परिचय डॉ. तुषार फिरके यांनी तर आभार सुभाष अमळनेरकर यांनी मानले. यावेळी क्लबच्या रोस्टर आणि अजिंठा या बुलेटीनचे तसेच गेल्या वर्षीच्या बातम्यांचा संग्रह प्रतिध्वनीचे प्रकाशन करण्यात आले. प्रारंभी ॲड. कीर्ती पाटील यांनी गणेश वंदना सादर केली. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. नूतन अध्यक्ष व सचिवांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. रोटरी फाउंडेशनच्या देणगीदारांमध्ये मेजर डोनर या सन्मानाबद्दल जितेंद्र ढाके तसेच इंडॉसमेंट फंडला देणगी दिल्याबद्दल डॉ. तुषार फिरके यांचा सत्कार करण्यात आला. नूतन कार्यकारणी पुढीलप्रमाणे : कोषाध्यक्ष संदीप शर्मा, आयपीपी गिरीश कुलकर्णी, कार्यकारी मंडळ सदस्य - छबीलदास शाह, प्रेम कोगटा, किशोर मंडोवरा, डॉ. जयंत जहागीरदार, डॉ. तुषार फिरके, जितेंद्र ढाके, ॲड. सागर चित्रे, मनोज जोशी, प्रा. डॉ. शुभदा कुलकर्णी, डॉ. काजल फिरके, प्रदीप खिवसारा, योगेश गांधी, डॉ. पराग जहागीरदार, उदय पोतदार, सुभाष अमळनेरकर, पंकज व्यवहारे, राजेश यावलकर, राकेश चव्हाण, चंदन महाजन, रितेश जैन, विश्वजीत बऱ्हाटे, तेजस पवार.

## माऊली इन्फ्रास्ट्रक्चर प्रकरणी चौकशी अहवाल सुरक्षित ठेवण्याची मागणी

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुक्ताईनगर प्रतिनिधी

मुक्ताईनगर विभागातील ब्रेकडाऊन मेंटेनन्सच्या कामांमध्ये झालेल्या कथित अनियमिततेच्या चौकशी अहवालात कोणताही फेरफार होऊ नये, तसेच तो तातडीने वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात यावा, अशी मागणी महावितरणच्या जळगाव प्रादेशिक कार्यालयाचे मुख्य अभियंता यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात मुक्ताईनगर येथील अमोल बाबुराव बोदडे यांनी सविस्तर निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, माऊली इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने एप्रिल २०२५ पासून ब्रेकडाऊन मेंटेनन्स अंतर्गत केलेल्या विविध कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर कथित अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे आणि शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याची तक्रार यापूर्वी करण्यात आली होती. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळांची पाहणी करून चौकशी केली असून, उपअभियंत्यांनी आपला अहवाल कार्यकारी अभियंता, मुक्ताईनगर यांच्याकडे सादर केल्याची माहिती निवेदनात नमूद करण्यात आली आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, चौकशी अहवालात गंभीर आर्थिक अनियमिततेबाबत निरीक्षणे नोंदविण्यात आल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे हा अहवाल तातडीने वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविणे अपेक्षित असताना तो अद्याप प्रलंबित असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच, या प्रकरणात आठ सहाय्यक अभियंत्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्याची माहितीही समोर आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, चौकशी अहवालात कोणताही बदल, फेरफार किंवा पुराव्यांमध्ये छेडछाड होऊ नये, यासाठी कार्यकारी अभियंता, मुक्ताईनगर यांच्याकडून मूळ चौकशी अहवाल तात्काळ मागवून तो सुरक्षितपणे जळगाव प्रादेशिक कार्यालयात जमा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, अहवाल विनाकारण प्रलंबित ठेवण्यात आला असल्यास त्यामागील कारणांची चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार प्रशासकीय कारवाई करावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शासनाच्या निधीचा वापर, सार्वजनिक हित आणि महावितरणच्या प्रतिमेशी संबंधित हे प्रकरण असल्याने याची निष्पक्ष, पारदर्शक आणि सखोल चौकशी करून आवश्यक ती तातडीची कार्यवाही करावी, अशी विनंती मुख्य अभियंत्यांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, ती प्राप्त झाल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

## विवेकानंद प्रतिष्ठान संचलित महाविद्यालयात गुणवंत सत्कार

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी



विवेकानंद प्रतिष्ठान संचलित कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांत गुणवंतांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. दिनांक १० जुलै २०२६ रोजी महाविद्यालयात इ. १२ वी तसेच महाविद्यालयात प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा व विविध स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे अध्यक्ष विनोद पाटील, माजी विद्यार्थी व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. वरुणराज नन्नवरे, शालेय समिती प्रमुख डॉ. महेंद्र शिरोडे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश बारी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रमुख डॉ. हर्षा खडके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलन व पाहुण्यांच्या सत्काराने करण्यात आली. कार्यक्रमाचा उद्देश व संस्थेच्या कार्याचा आढावा आपल्या प्रस्तानेतून डॉ. हर्षा खडके यांनी मांडला. सत्कार समारंभात इ. १२ वीच्या वर्गातून महाविद्यालय स्तरावर प्रथम पाच क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, जेईई अडव्हांस परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व महाविद्यालयातून प्रथम, व्दितीय आणि तृतीय वर्षातून उत्तीर्ण झालेले व विविध स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी आणि पुष्प देऊन गौरविण्यात आले. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश बारी, अध्यक्ष विनोद पाटील यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. हितेश ब्रिजवासी व समारोप प्रा. हितेंद्र सरोदे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. रमेश बारी, डॉ. हर्षा खडके व विवेकानंद प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी दिनेश ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. वैजयंती चौधरी, सुनील नारखेडे, डॉ. संतोष बडगुजर, सुनील बारी, प्रदीप सपकाळे, सागर पाटील आदींनी सहकार्य केले.

## लासगावात कापूस पीक प्रात्यक्षिकाची पाहणी

लोकशाही न्यूज नेटवर्क
लासगाव प्रतिनिधी





लासगाव येथे कृषि विभागाच्या ''कापूस उत्पादकता अभियान (कपास कांती)'' अंतर्गत सघन व क्लोजर एचबी स्पेसिंग कापूस पीक प्रात्यक्षिकाची वरिष्ठ कृषि अधिकाऱ्यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. श्रीराम शेतकरी दूध उत्पादक गट व एकता शेतकरी गटामार्फत राजेंद्र तायडे व कैलास पाटील यांच्या शेतात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कुर्बान तडवी, उपविभागीय कृषि अधिकारी किशोर मांडगे, तालुका कृषि अधिकारी सुधाकर कराड, मंडळ कृषि अधिकारी यू. आर. जाधव व कृषि अधिकारी रामेश्वर पाटील उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी आधुनिक लागवड तंत्रज्ञान, एकात्मिक पीक व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण, संतुलित खत व्यवस्थापन तसेच बदलत्या हवामानाशी सुसंगत शेतीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कमी खर्चात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी सुधारित शेती पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. तसेच महाविस्तार एआय मोबाईल ॲपची माहिती देत त्याचा नियमित वापर करून शेतीविषयक तांत्रिक मार्गदर्शन, हवामानाचा अंदाज आणि पीक व्यवस्थापनाची माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमास श्रीराम व एकता शेतकरी गटाचे सदस्य तसेच परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक कृषि अधिकारी सुनील साळवे व रविंद्र पाटील यांनी परिश्रम घेतले.

## नागरिकांच्या तक्रारींसाठी आजपासून टोल फ्री क्रमांक सुरू

**महापौर दीपमाला काळे यांचे आवाहन : जळगाव मनपाचा स्तुत्य उपक्रम**

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

जळगाव शहरातील नागरिकांना आता आपल्या किरकोळ तक्रारी आणि समस्यांसाठी महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये फेऱ्या मारण्याची गरज उरणार नाही. नागरिकांचा बहुमूल्य वेळ वाचवण्यासाठी आणि त्रासातून सुटका करण्यासाठी जळगाव शहर महानगरपालिकेच्या महापौर सौ. दीपमाला मनोज काळे यांच्या संकल्पनेतून एक विशेष टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ००१५ सुरू करण्यात येत आहे. येत्या सोमवार, दिनांक १३ जुलैपासून ही सेवा कार्यान्वित होणार आहे. महानगरपालिकेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकानुसार, अनेकदा नागरिकांना लहान-सहान नागरी समस्यांसाठी मनपा कार्यालयात प्रत्यक्ष यावे लागते. यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाया जातो. यावर तोडगा म्हणून महापौर कार्यालयाने ही हेल्पलाईन सुरू केली आहे. नागरिक १३ जुलैपासून १८०० २३३ ००१५ या क्रमांकावर सकाळी १० ते ६ (सुट्टीचे दिवस वगळून) संपर्क साधून घरबसल्या आपल्या तक्रारी किंवा समस्या नोंदवू शकतील. या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींची त्वरित नोंद घेतली जाईल. त्यानंतर संबंधित तक्रार तात्काळ जळगाव मनपाच्या संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात येईल आणि त्यावर वेगाने कार्यवाही करून समस्येचे निवारण केले जाईल, अशी माहिती महापौर कार्यालयाकडून देण्यात आली आहे. ''नागरिकांनी मनपा कार्यालयात न येता या घरबसल्या मिळणाऱ्या सुविधेचा आणि टोल फ्री क्रमांकाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,'' असे आवाहन महापौर दीपमाला काळे यांनी जळगाव शहर महानगरपालिकेच्या वतीने केले आहे.

## रिक्षाचालकाचा गळफास

लोकशाही न्यूज नेटवर्क
भुसावळ प्रतिनिधी

शहरातील गणेश कॉलनी, जळगाव रोड परिसरात राहणाऱ्या विनोद पंडित बाविस्कर (वय ५८) यांनी राहत्या घरातील खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भुसावळ शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद बाविस्कर हे रिक्षाचालक होते. कुटुंबीयांनी त्यांना घरातील खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत पाहिल्यानंतर ही घटना उघडकीस आली. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेबाबत भुसावळ शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू क्रमांक २७/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, ते काही काळापासून वैयक्तिक अडचणींमुळे मानसिक तणावात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून, आत्महत्येचे नेमके कारण तपासातून स्पष्ट होणार आहे.

# विठ्ठलनामाच्या गजरात 'विठाई एक्सप्रेस'चे श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान

**हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत आले भक्तिमय सोहळ्याचे स्वरूप : सलग सहाव्या वर्षी आयोजन**

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव प्रतिनिधी






आमदार मंगेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून सलग सहाव्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या चाळीसगाव ते श्रीक्षेत्र पंढरपूर विशेष रेल्वे वारीचा प्रस्थान सोहळा शनिवारी सायंकाळी अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि हजारो वारकरी भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराज चौक मैदान येथे माऊलींच्या पालखीचे विधिवत पूजन व आरती करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी जळगाव लोकसभेच्या खासदार स्मिता वाघ, जिल्हा बँक अध्यक्ष श्री. संजय पवार, चाळीसगाव नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. प्रतिभा चव्हाण, तालुक्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधी, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी वारकरी माता-भगिनींशी संवाद साधत त्यांच्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. पंढरपूर वारीची परंपरा, वारकरी संप्रदायाचे महत्त्व आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यानंतर टाळ-मृदंग, वीणा, अभंग आणि ''राम कृष्ण हरी'', ''जय हरी माऊली''च्या अखंड गजरात माऊलींच्या पालखीची मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक मैदानातून चाळीसगाव रेल्वे स्थानकाकडे रवाना झाली. संपूर्ण मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. चाळीसगाव रेल्वे स्थानकावर पोहोचल्यानंतर वारकरी भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने विशेष रेल्वेत प्रवेश केला. ज्येष्ठ नागरिकांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी स्वयंसेवक आणि भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते प्रत्येक डब्यात मदतीसाठी सज्ज होते. विशेष रेल्वेला हिरवा झेंडा मिळाल्यानंतर विठ्ठलनामाच्या अखंड गजरात 'विठाई एक्सप्रेस' श्रीक्षेत्र पंढरपूरच्या दिशेने रवाना झाली. रेल्वे सुरू होताच प्रत्येक डब्यात वारकरी भाविकांनी घरून प्रेमाने आणलेल्या शिदोरीचा एकमेकांसोबत आनंदाने आस्वाद घेतला. आमदार मंगेश चव्हाण यांनी प्रत्येक बोगीत जाऊन वारकरी माता-भगिनी व ज्येष्ठ नागरिकांची आस्थेने विचारपूस केली. त्यांच्या शेजारी बसून त्यांनी प्रेमाने वाढलेल्या मीठ-भाकरीसह घरगुती जेवणाचा आस्वाद घेतला. आपला आमदार आपल्या सोबत बसून आपुलकीने संवाद साधत असल्याचे पाहून वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता. विशेष रेल्वेतील संपूर्ण वातावरण विठ्ठलमय झाले होते. टाळ-मृदंगाच्या तालावर अभंग, भजन आणि विठ्ठलनामाचा अखंड गजर सुरू असताना हजारो वारकरी भक्तिभावाने श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाले.



# SBI फंड्स मॅनेजमेंटचाआयपीओ मंगळवारी खुला होणार

फंड्स मॅनेजमेंटने आपल्या पहिल्यावहिल्या प्रारंभिक जाहीर भाग विक्रीसाठी (आयपीओ) प्रत्येकी ₹१ दर्शनी मूल्य असलेल्या प्रति इक्विटी शेअरचा किंमतपट्टा) ₹५४५ ते ₹५७४ निश्चित केला आहे.कंपनीचा हा आयपीओ किंवा ''ऑफर'') वर्गणीसाठी मंगळवार, १४ जुलै २०२६ रोजी खुला होईल आणि गुरुवार, १६जुलै २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान २६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर २६ड




क्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ म्हणजे प्रत्येकी ₹१ दर्शनी मूल्य असलेल्या तब्बल २०३,७०९,२३९ इक्विटी शेअर्सची 'ऑफर-फॉर-सेल' आहे.अँकर गुंतवणूकदारांसाठी बोली/ऑफर सोमवार, १३ जुलै २०२६ रोजी खुली आणि बंद होईल.मूळची १९९२ मध्ये स्थापना झालेली ही कंपनी, ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या ₹१२,५०९.९८अब्ज त्रैमासिक सरासरी व्यवस्थापना खालील मालमत्ता आणि १५.३% म्युच्युअल फंड मार्केट शेअरसह, च्या दृष्टीने भारतातील सर्वात मोठी मालमत्ता व्यवस्थापन कंपनी आहे. ही कंपनी ₹४,०५५.२६अब्ज पॅसिव्ह सह भारतातील सर्वात मोठी पॅसिव्ह मालमत्ता व्यवस्थापक देखीलआहे, ज्याचा मार्च३१, २०२६ पर्यंत बाजारातील हिस्सा२७.९% आहे.

# अर्थ भारतचा गिफ्ट सिटीमध्ये पहिला सुवर्ण फंड लॉंच

भारताच्या प्रमुख फायनान्शियल हबमधील अग्रगण्य फंड मॅनेजमेंट कंपनी अर्थ भारत इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स ने 'अर्थ भारत फिजिकल गोल्ड फंड' लॉंच केला आहे. हा गिफ्ट सिटीमधून सुरू झालेला पहिला फिजिकल कमॉडिटी फंड आणि पहिला गोल्ड फंड आहे. ने जानेवारी २०२६ पासून कमॉडिटी ट्रेडिंगला फायनान्शियल प्रॉडक्ट म्हणून मान्यता दिल्यानंतर हा फंड लॉंच करण्यात आला आहे. या ऐतिहासिक लॉंचमुळे गिफ्ट सिटी रेग्युलेटरने तयार केलेल्या सक्षम रेग्युलेटरी फ्रेमवर्कला नवा टप्पा मिळाला आहे. ''आम्ही इंटरनॅशनल फायनान्शियल सर्व्हिसेस अथॉरिटीचे आभारी आहोत की त्यांनी इंडस्ट्रीसोबत काम करून मजबूत रेग्युलेटरी फ्रेमवर्क तयार केले, ज्यामुळे इनोव्हेशनला प्रोत्साहन मिळेल आणि नवीन प्रॉडक्ट ऑफरिंगला चालना मिळेल. यामुळे गिफ्ट सिटी हा या प्रदेशातील प्रमुख म्हणून स्थापित होईल,'' असे अर्थ भारत इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स चे मॅनेजिंग पार्टनर सचिन सावरीकर यांनी सांगितले.हा ओपन-एंडेड, पॅसिव्हली मॅनेज्ड फंड सिंगापूरस्थित प्रेशियस मेटल्स स्पेशालिस्ट सोबत भागीदारीत लॉंच करण्यात आला आहे.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल - subodh.ranshevre@rediffmail.com

# नवनीतची 'जब बारी हो तुम्हारी, डायजेस्ट से करो तैयारी' मोहिम

नवनीत एज्युकेशन लिमिटेडने आपल्या नवीन 'जब बारी हो तुम्हारी, डायजेस्ट से करो तैयारी' या मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेद्वारे कंपनीचे प्रमुख उत्पादन नवनीत डायजेस्ट हे परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विश्वासार्ह अभ्यास साथी म्हणून सादर करण्यात आले आहे.ही मोहीम दर्शवते की नवनीत डायजेस्टआज ही विद्यार्थ्यांसाठी अभ्यास आणि उजळणी अधिक सोपी बनवते. यामध्ये सुव्यवस्थित अभ्यास सामग्री, प्रकरण निहाय सारांश, मेमरी मॅप्स, सराव प्रश्न तसेच परीक्षेच्या प्रभावी तयारीसाठी उपयुक्त साधने उपलब्ध करून दिली जातात, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने उत्तम काम गिरी करता येते.हि नवी मोहीम एका साध्यापण अत्यंत समर्पक विचारावर आधारित आहेप्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात असा एक टप्पा येतो, जेव्हा त्याला स्वतः च्या बळावर एकाग्रतेने परीक्षेची तयारी करावी लागते. अशावेळी त्याला तात्काळ मार्गदर्शन करणारे कोणीही उपलब्ध नसते. हलक्या फुलक्या आणि आकर्षक कथनशैलीत सादर करण्यात आलेल्या या मोहिमेद्वारे नवनीत डायजेस्ट स्वतःला विद्यार्थ्यांचा कायमचा विश्वासू साथीदार म्हणून सादर करते. हे विद्यार्थ्यांना विचलित करणाऱ्या गोष्टी आणि संभ्रमयां पासून दू रठेवत, परीक्षा भिमुख स्पष्ट आणि अचूक उत्तरे त्यांना सर्वाधिक गरज असते.

# मिलवर्क्स टेक्नॉलॉजीजचा आयपीओ १४ जुलैपासून खुला होणार

उच्च-अचूकतेचे यंत्र प्रक्रिया केलेले घटक, शीट मेटलपार्ट्स, सब-असेंब्लीज आणि इंटिग्रेटेड असेंब्लीज यांच्या उत्पादनात कार्यरत मिलवर्क्स टेक्नॉलॉजीज लिमिटेडने आपली इनिशियल पब्लिकऑफरिंग (आयपीओ) मंगळवार, १४ जुलै २०२६ रोजी खुली करण्याची घोषणा केली आहे. कंपनीचे वरच्या किंमत पट्ट्यानुसार ₹१६०.३३

Millworks
Machining your Concept

कोटी उभारण्याचे उद्दिष्ट असून, कंपनीचे समभाग बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध होणार आहेत. या इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) अंतर्गत प्रत्येकी ₹१० दर्शनी मूल्याचे ४८,४४,००० इक्विटी शेअर्स जारी करण्यात येणार असून, प्रति शेअर किंमतपट्टा ₹३१५ ते ₹३३१ निश्चित करण्यात आला आहे. आयपीओ मधून उभारण्यात येणारा निधी संयंत्र व यंत्र सामग्री खरेदीसाठी भांडवली खर्च, कार्यकारी भांडवलाच्या गरजा आणि सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरण्यात येणार आहे. या इश्यूसाठी अँकर गुंतवणूकदारांची बोली प्रक्रिया सोमवार, १३ जुलै २०२६ रोजी होईल. आयपीओ मंगळवार, १४ जुलै २०२६ रोजी गुंतवणुकीसाठी खुला होईल आणि गुरुवार, १६ जुलै २०२६ रोजी बंद होईल. या इश्यूचे बुकर निंगलीड मॅनेजर जीवायआर कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड असून, पूर्वाशिअ रजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड ही रजिस्ट्रार म्हणून कार्यरत आहे.

# निवडणूक आयोगाचे प्रपत्र भरण्यासाठी निर्वाणा फाउंडेशनचा मदतीचा हात




लोकशाही न्यूज नेटवर्क
मुक्ताईनगर प्रतिनिधी

भारतीय निवडणूक आयोगाच्या विविध प्रपत्रांचे भरणे सुलभ व्हावे आणि प्रत्येक पात्र नागरिकाला निवडणूक प्रक्रियेत सहभागी होता यावे, या उद्देशाने निर्वाणा फाउंडेशनतर्फे विशेष मदत शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात मतदार नोंदणी, नाव समाविष्ट करणे, नाव दुरुस्ती, पत्ता बदल तसेच इतर आवश्यक प्रपत्रे भरून देण्यासाठी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. स्वयंसेवकांनी आवश्यक कागदपत्रांची माहिती देत नागरिकांना प्रपत्रे अचूकपणे भरून देण्यास मदत केली. या उपक्रम ाच्या यशस्वी आयोजनासाठी निर्वाणा फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. प्रफुल्ल किशोर मेढे यांनी विशेष पुढाकार घेतला. तसेच निर्वाणा फाउंडेशनच्या सर्व सेवकांनी नागरिकांना प्रपत्रे भरण्यासाठी मोलाची मदत व सहकार्य केले. या उपक्रमामुळे अनेक नागरिकांची निवडणूक आयोगाशी संबंधित कामे सुलभ झाली असून, लोकशाही प्रक्रियेत अधिकाधिक नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचीआवश्यकता असल्याचे उपस्थितांनी मत व्यक्त केले.

# एसआयआर फॉर्म स्वीकृती शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकशाही न्यूज नेटवर्क
फैजपूर प्रतिनिधी



फैजपूर शहरातील गणेश कॉलनी, विद्यानगर, भुसावळ रोड ते जानकी नगर-राजबाग परिसर तसेच शांती विद्यामंदिर व गुरुकुल येथील मतदान केंद्रांवरील म तदारांसाठी आयोजित एसआयआर फॉर्म स्वीकृती शिबिरास उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. ११ ते १५ जुलैदरम्यान आयोजित या शिबिराचा शुभारंभ ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात करण्यात आला. आमदार अमोल जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात यादी भाग क्रमांक २३९ ते २४५ तसेच प्रभाग क्रमांक ८, ९ आणि १० मधील मतदारांचे एसआयआर फॉर्म भरून घेण्यात आले. या टप्प्यात ५१५ मतदारांची नोंदणी अपेक्षित असताना एकूण ५३५ एसआयआर फॉर्म स्वीकारण्यात आले. शिबिराचे उद्घाटन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन राणे, मंडलाध्यक्ष उमेश बेंडाळे आणि माजी उपनगराध्यक्षा निकिता कोळी यांच्या हस्ते भारतमाता प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आले. यावेळी गटनेते सिद्धेश्वर वाघूळदे, उपगटनेते सुरज गाजरे, नगरसेविका सुनीता नेहेते, भावना भारंबे, समाजसेवक प्रकाश कोळी, चंद्रकांत कोळी, अनंता नेहेते, संदीप भारंबे, पिंटूभाऊ तेली, संजय सराफ, संजय रल, विनोद बोरोले, पप्पू जाधव, सुनील जोगी, तलाठी श्रीकांत केंद्रे, तेजस पाटील, निलेश चौधरी, शरीफ तडवी तसेच बीएलओ पुष्पा फेंगडे, अर्चना जोगी, उमाकांत चौधरी यांच्यासह सर्व बीएलओ व बीएलओ-२ उपस्थित होते. दरम्यान, १२ जुलै रोजी कुबरेश्वर महादेव मंदिर (जनशक्ती कॉलनी), १३ जुलै रोजी रामेश्वर महादेव मंदिर, १४ जुलै रोजी नीलकंठेश्वर महादेव मंदिर (आसाराम नगर) आणि १५ जुलै रोजी पंचमुखी हनुमान मंदिर (जानकी नगर, यावल रोड) येथे एसआयआर फॉर्म स्वीकृती शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. शिबिरात येताना मतदारांनी दोन रंगीत पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड व मतदार ओळखपत्राच्या प्रत्येकी दोन झेरॉक्स प्रती, आई-वडिलांचे पूर्ण नाव, विद्यमान म तदार यादीतील अनुक्रमांक तसेच २००२ च्या मतदार यादीतील अनुक्रमांकाची माहिती सोबत आणावी, असे आवाहन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त म तदारांनी या संधीचा लाभ घेऊन एसआयआर प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन भाजपच्या वतीने करण्यात आले.

# 'कास्ट्राईब शिक्षक संघटना' चाळीसगावतर्फे गुणवंत विद्यार्थी व पालक सत्कार सोहळा

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रातील यशाचा आलेख उंचावणारे, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन केलेले विद्यार्थी आणि त्यांना घडवणारे पालक यांचा गौरव करण्यासाठी 'कास्ट्राईब शिक्षक संघटना, चाळीसगाव' सज्ज झाली आहे. संघटना आयोजित या विशेष सत्कार सोहळ्यात इयत्ता १० वी, १२ वी व इतर पदवी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत पाल्यांचा आणि त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पुरस्कार प्राप्त शिक्षक बंधू-भगिनींचाही या कार्यक्रमात गौरव केला जाणार आहे.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून राज्यनेते प्रभाकर पारवे उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तालुक्याचे लाडके गटशिक्षणाधिकारी भोई भूषवणार आहेत. या कार्यक्रमाचे महत्त्व विशद करताना संघटनेचे अध्यक्ष नितीन मोरे म्हणाले की, ''विद्यार्थ्यांच्या यशात पालकांचे मोठे योगदान असते, त्याम ुळेच यावर्षी आम्ही केवळ विद्यार्थ्यांचाच नव्हे, तर त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या पालकांचाही सत्कार करणार आहोत.'' आपल्या परिचयातील किंवा कुटुंबातील जर कोणी गुणवंत विद्यार्थी यावर्षी उत्तीर्ण झाले असतील, तर त्यांची नावे आणि पालकांची माहिती त्वरित आमच्यापर्यंत पोहोचवावी. शिक्षकांनीही स्वतः ची माहिती कळवावी, असे आवाहन संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी खालील पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा: नितीन मोरे (९८२२११६७७३),राहुल जाधव (९५११७९२४५७), दाभाडे (८३२९४१४१०९), राहुल पारवे (७५८८००९४०३) किंवा सचिन अहिरराव (९८२२२१०८३८). यशाच्या या जल्लोषात सहभागी होऊन गुणवंतांचा गौरव वाढवावा, असे आवाहन अध्यक्ष मोरे नितीन रामदास व सरचिटणीस छगन देवचंद दाभाडे यांच्यासह सर्व पदाधिकारी, कास्ट्राईब शिक्षक संघटना, चाळीसगाव यांनी केले आहे.

# भ्रष्टाचाऱ्यांना आपल्याकडे कडक शासन केव्हा होणार?

चीनमधील नानजिंग आर्थिक विकास क्षेत्राचे माजी वरिष्ठ अधिकारी यांग योलिन यांना ३० वर्षांत तब्बल ३ सहस्र कोटी रुपयांची लाच स्वीकारल्याच्या प्रकरणी न्यायालयाने नुकतीच फाशीची शिक्षा सुनावली. न्यायालयाने यांग योलिन यांना केवळ लाचखोरीच नव्हे, तर सार्वजनिक निधीचा अपहार, सत्तेचा गैरवापर, आर्थिक गैरव्यवहार आणि इतर आर्थिक गुन्ह्यांमध्येही दोषी ठरवले आहे. तसेच त्यांच्या सर्व वैयक्तिक मालमत्ता जप्त करण्याचे आणि अवैधरित्या मिळवलेली संपूर्ण रक्कम वसूल करण्याचे आदेशही दिले. चीनमधील नारिकांनी न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. भ्रष्टाचार ही केवळ भारतालाच नव्हे तर जगाला लागलेली कीड आहे; मात्र अन्य देशांत ज्या प्रकारे भ्रष्टाचाऱ्यांना शासन केले जाते तसे भारतात का केले जाते हाच प्रश्न या निमित्ताने निर्माण झाला आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत अनेक सरकारे आली आणि गेली; मात्र भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्यासाठी कोणीही विशेष प्रयत्न केलेले नाहीत. शिपायापासून बड्या अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे पसरलेली असतात त्यामुळे कारवाई तरी कोणावर करायची हा प्रश्नच असतो. भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यासाठी सरकारचा स्वतंत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आहे. या विभागाकडून प्रतिवर्षी भ्रष्टचाराची शेकडो प्रकरणे उघडकीस आणली जातात; मात्र त्यांपैकी किती प्रकरणात कारवाई होते? अनेक प्रकरणे वर्षोनुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहतात.

केंद्रीय दक्षता आयोगाच्या अहवालानुसार, सीबीआयद्वारे तपासण्यात आलेली ७,०७२ हून अधिक भ्रष्टाचाराची प्रकरणे आज विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. यातील तब्बल २,६६० प्रकरणे १० वर्षांहून अधिक काळ, तर ३७९ प्रकरणे २० वर्षांहून अधिक काळापासून खटल्यात अडकलेली आहेत. याव्यतिरिक्त, सीबीआय व आरोपींनी दाखल केलेल्या सुमारे १३,१०० अपील व पुनर्विलोकन याचिका विविध उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालानुसार, भ्रष्टाचाराच्या कारवायांमध्ये महाराष्ट्र सलग काही वर्षांपासून देशात प्रथम क्रमांकावर



आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागच्या ताज्या आकडेवारीनुसार, राज्यात वर्षभरात ९०६ लाचखोर पकडले गेले; परंतु वर्षाखेरपर्यंत केवळ १९% प्रकरणांमध्येच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होऊ शकले आहे. राज्यात दाखल झालेल्या भ्रष्टाचाराच्या एकूण प्रकरणांपैकी तब्बल ९४% प्रकरणे विविध न्यायालयांत प्रलंबित आहेत. महसूल आणि पोलिस विभागातील कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे सर्वाधिक गुन्हे नोंदवले गेले आहेत. विकासासाठी आणि जनतेच्या सोयीसुविधांसाठी शासनाकडून विविध योजना आखल्या जातात. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो; मात्र राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचारामुळे या शासकीय योजना आणि निधी तळागाळापर्यंत येईपर्यंत त्यातील बराचसा मलिदा राजकीय मंडळींकडून लाटला जातो. माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी देशातील भ्रष्टाचारावर भाष्य करताना म्हटले होते 'सामान्य लोकांच्या योजनांसाठी दिल्लीतून निघालेल्या १०० रुपयांपैकी सामान्य लोकांपर्यंत केवळ १० रुपयेच पोहोचतात.' शासकीय कार्यालये भ्रष्टाचाराची कुरणे आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात. शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या म ागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. मासिक वेतनाव्यतिरिक्त अधिक पैसे मिळावेत, कमी मालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही ही मुजोरी. भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा म ोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार? आजतागायत कित्येक मंत्र्यांवर, राजकीय नेत्यांवर कोट्यवधी रुपयांच्या योजनांतील भ्रष्टाचाराचे आरोप झाले; मात्र त्यापैकी केवळ हाताच्या बोटावर मोजता येईल एवढ्याच मंडळींना शिक्षा झाली. 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' आणि विविध न्यायालयीन अहवालांनुसार, राजकीय नेत्यांशी संबंधित भ्रष्टाचाराच्या खटल्यांमध्ये आरोपी दोषी ठरण्याचे प्रम ाण केवळ ६% ते १२% च्या दरम्यान आहे. तब्बल ८५% ते ९०% प्रकरणांमध्ये राजकीय नेते पुराव्याअभावी निर्दोष सुटतात किंवा तांत्रिक त्रुटींमुळे (उदा. राज्य सरकारकडून खटला चालवण्याची मंजुरी न मिळणे) त्यांच्यावरील खटले रद्द होतात. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आता लोकप्रतिनिधींसाठी (खासदार/आमदार) विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. तरीही, अद्याप देशात लोकप्रतिनिधींवर भ्रष्टाचाराचे आणि इतर गुन्हेगारी स्वरूपाचे ५,००० हून अधिक खटले प्रलंबित आहेत. प्रशासकीय अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप होणे आणि आरोप सिद्ध होऊन आरोपीला शिक्षा होण्याचे प्रमाणसुद्धा राजकीय नेत्यांप्रमाणेच नगण्य आहे. अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते. चीनमधील माजी वरिष्ठ अधिकारी यांग योलिन यांना ज्याप्रमाणे भ्रष्टाचाराच्या प्रकरणी फाशीची शिक्षा झाली त्याप्रमाणे भारतातही अशा स्वरूपाची शिक्षा भ्रष्ट आणि मुजोर प्रशासकीय अधिकाऱ्यांना, राजकीय नेत्यांना जोपर्यंत होत नाही तोपर्यंत भ्रष्टाचार असाच चालत राहणार का?



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई

# चोपडा येथे अन्नसुरक्षा विभागाच्या कारवाईने धाक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

सद्ध्या सर्वत्र अन्न व औषध प्रशासन विभागाच्या धाडी होत असून चोपडा येथे ही दोन दुकानांवर धाड टाकून मानवी आरोग्यास अपायकारक विमल घुटका, सुगंधीत तंबाखू व करमचंद पान मसाला जप्त करण्यात आले आहे. याबाबत सविस्तर माहीती अशी की अन्न सुरक्षा अधिकारी आकाश बोराडे व शहर पोलीसांच्या टीमने शहरातील भाजी मंडई परिसरातील रॉयल फ्रुट समोरील सार्वजनिक जागेवर फिरोज हुसेन बागवान रा. दर्गाअली आजाद चौक हा मानवी शरीरास अपायकारक असलेला विमल गुटखा, करमचंद, सुगंधीत तंबाखू, ताणसेन पान मसाला विक्री करतांना आढळून आला. तसेच विरवाडे गावातील प्रवीण प्रल्हाद पाटील हा आपल्या भोलेनाथ पान टपरीवर अवैधरित्या गुटख्याची विक्री करतांना आढळून आला. म्हणून त्याच्यावर कार्यवाही करण्यात आली. जळगाव कार्यालयातील अन्नसुरक्षा अधिकारी आकाश बोराडे यांच्या फिर्यादी वरून दोघां आरोपी विरुद्ध चोपडा शहर पोलिसांत अन्नसुरक्षा व मानके कायद्यानुसार २००६ मधील कलम २६/२ सहवाचता कलम २६/२ (४) २७ (३) ई (३) अन्नसुरक्षा आयुक्तांच्या दिनांक १६/७२०२५ रोजीच्या शासन राजपत्र चे उल्लंघन केल्याप्रमाणे शिक्षा कलम५९नुसार गुन्हा दाखल केला आहे.



## महत्वाचे

### अनैतिक संबंधांच्या वादातून हत्या

**रावेर –** तालुक्यातील नांदूरखेडा शिवारात शेतात आढळलेल्या ३० वर्षीय मजुराच्या मृत्यूचे गूढ रावेर पोलिसांनी उलगडले असून, अनैतिक संबंधांच्या वादातून दोन मित्रांनी मिळून त्याचा गळा आवळून खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात एका संशयिताला अटक करण्यात आली असून मुख्य संशयिताचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत शेख कुरबान शेख शब्बीर (वय ३०) हा ९ जुलैच्या रात्रीपासून बेपत्ता होता. ११ जुलै रोजी सकाळी नांदूरखेडा शिवारातील कपाशीच्या शेतात त्याचा मृतदेह आढळून आला. शवविच्छेदन अहवालात गळा दाबल्याने मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तपासाची दिशा बदलली. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, मुख्य संशयित गणेश संजय घोरपडे याचे मयताच्या पत्नीशी अनैतिक संबंध होते. एप्रिल २०२६ मध्ये ऐनपूर येथे दोघांना रंगेहात पकडल्यानंतर त्याला मारहाण करण्यात आली होती. त्या घटनेचा राग मनात धरून त्याने मयताला ''तू आमच्या संबंधांमध्ये आला तर तुला जिवंत सोडणार नाही,'' अशी धमकी दिल्याचे तपासात समोर आले आहे. ९ जुलैच्या रात्री गणेश घोरपडे व मेघराज वसंत सांगळे यांनी मयताला दारू पाजून मोटारसायकलवरून नांदूरखेडा शिवारात नेले. तेथे हाताने गळा आवळून त्याची हत्या केली आणि मृतदेह कपाशीच्या शेतात टाकून दोघे पसार झाले, असा पोलिसांचा प्राथमिक तपास आहे.

### शेतातील सोलर पंपाची तांब्याची वायर चोरी

**जळगाव –** जामनेर तालुक्यातील पाटखेडा शिवारातील शेतात बसविण्यात आलेल्या सोलर पंपाची सुमारे १०५ मीटर लांबीची तांब्याची वायर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी जामनेर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाटखेडा येथील शेतकरी जुलाल सुधाकर पाटील (वय ४८) यांच्या शेतातील सोलर पंपाला जोडलेली सुमारे १०५ मीटर तांब्याची वायर ९ जुलै रोजी सायंकाळी ६ ते १० जुलै रोजी सकाळी ८ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. चोरीस गेलेल्या तांब्याच्या वायरची किंमत सुमारे ४,५०० रुपये असून, शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले आहे.

# मुक्ताईनगर शहर मोकाट गुरांच्या विळख्यात!

## प्रशासन मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का? : महादेव मंदिर परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

मुक्ताईनगर शहरात मोकाट गुरांचा वाढता उपद्रव आता गंभीर स्वरूप धारण करत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि धार्मिक स्थळांच्या परिसरात दिवसभर मोकाट गुरांचा मुक्त संचार सुरू असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः सकाळी शहरातील विविध भागांत तर सायंकाळच्या वेळी अलंकार परिसरापासून महादेव मंदिरापर्यंतच्या रस्त्यावर मोकाट गुरे रस्ता अडवून उभी राहत असल्याचे चित्र दररोज पाहायला मिळत आहे. महादेव मंदिरात दररोज महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह अनेक भाविक दर्शनासाठी येतात. अनेक ज्येष्ठ नागरिक मंदिर परिसरात विरंगुळ्यासाठी बसत असतात. मात्र मोकाट गुरांच्या वावरामुळे या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकदा गुरे एकमेकांशी झुंज देताना, धावताना किंवा अचानक रस्त्यावर धाव घेताना दिसून येतात. त्यामुळे एखाद्या निष्पाप चिमुकल्याचा, म



हिला अथवा ज्येष्ठ नागरिकाचा जीव धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरातील नागरिकांनी अनेकदा या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असला तरी अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढत आहे. ''एखादा मोठा अपघात किंवा जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?'' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायत काळात मोकाट गुरांसाठी कोंढवाड्याची व्यवस्था होती. त्यामुळे रस्त्यांवरील मोकाट गुरांवर नियंत्रण ठेवणे शक्य होत होते. मात्र नगरपंचायत अस्तित्वात आल्यानंतर ही व्यवस्था कालांतराने बंद पडल्याचे नागरिक सांगतात. परिणामी शहरात मोकाट गुरांची संख्या वाढत गेली असून त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. मोकाट गुरांमुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असून दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक आणि पादचारी यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता नगरपंचायत प्रशासनाने तात्काळ विशेष मोहीम राबवून मोकाट गुरांचा बंदोबस्त करावा, कोंढवाड्याची व्यवस्था पुन्हा सुरू करावी आणि शहरातील प्रमुख रस्ते मोकळे करावेत, अशी जोरदार मागणी शहरवासीयांकडून होत आहे. वेळीच उपाययोजना झाली तर मोठा अनर्थ टळू शकतो; अन्यथा भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेची नैतिक जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न आता मुक्ताईनगरकर विचारू लागले आहेत.

# मराठा समाज विकास मंडळाचे आ. मंगेश चव्हाण यांना निवेदन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

छत्रपती राजर्षी श्री. शाहू महाराज मराठा समाज विकास मंडळ, चाळीसगाव यांच्या वतीने शनिवारी (दि. ११ जुलै) आमदार मंगेश चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात विविध मागण्यांसंदर्भात निवेदन सादर करण्यात आले.

या वेळी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समन्वय समितीचे सदस्य उपस्थित होते. निवेदनामध्ये छत्रपती श्री. शाहू महाराज यांचा पुतळा व स्मारक उभारणे, तसेच स्वर्गीय रमेश (पप्पुदादा) गुजाळ यांच्या नावाने खरजई नाका चौफुलीचे सुशोभीकरण करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी आमदार मंगेश चव्हाण आणि नगराध्यक्षा प्रतिभा चव्हाण यांनी मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली. नूतन पंचायत समितीजवळ छत्रपती श्री. शाहू महाराजांचे स्मारक तसेच मालेगाव चौफुलीजवळ त्यांचा पुतळा उभारण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. शासकीय नियम व कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता करून संबंधित कामे लवकरच सुरू करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. निवेदन देण्यासाठी भिमराव महाराज चव्हाण, मधुकर गवारे गुरुजी, अर्जुन आप्पा लोहके, मनाजीबाबा तांबे, भाऊसाहेब तात्या जाधव, देवानाना जाधव, साहेबराव जगताप, रामलाल शिंदे, विनायक मांडोळे, नगरसेवक राहुल मस्के, संजयभाऊ कापसे, डॉ. प्रशांत एरंडे, विलास बापू दुसिंग, नितीन गवारे, मधुकर गुजाळ, रविंद्र घोडके, रविंद्र पवार, प्रल्हाद सांवत, संजय दुसिंग, पिनू घुमरे, किशोर शिरसाठ, सुनील कावरे, शुभम मांडोळे, विजय पांगारे, अक्षय दुसिंग यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. दरम्यान, या कामांचा पाठपुरावा करण्यासाठी आमदार मंगेश चव्हाण यांच्या सूचनेनुसार विशेष समन्वय (कोअर) समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक राहुल मस्के यांची, तर उपाध्यक्षपदी संजयभाऊ कापसे यांची निवड करण्यात आली. समितीमध्ये भिमराव महाराज चव्हाण, विनायक मांडोळे, डॉ. प्रशांत एरंडे, भाऊसाहेब तात्या जाधव, विलास बापू दुसिंग, मधुकर गुजाळ, नानाभाऊ तांबे, किशोर शिंगटे आणि रोहित जाधव यांचा समावेश करण्यात आला.

# समाधान शिबीर अभियान पूर्वतयारी आढावा

## २२ ते २६ जुलैदरम्यान शिबिरांचे आयोजन : याद्या सादर करण्याच्या सूचना

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत दि. २२ ते २६ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरांच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आढावा बैठक संपन्न झाली.

बैठकीस महसूल, कृषी, जिल्हा परिषद, लीड बँक तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी अभियानाद्वारे पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन, विभागनिहाय समन्वय, विविध शासकीय लाभांचे वितरण तसेच अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत सर्व संबंधित विभागांनी आपल्या विभागामार्फत लाभ देण्यात येणाऱ्या पात्र लाभार्थ्यांची अद्ययावत यादी तयार करून सोमवार, १३ जुलै २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावी, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकर यांनी यावेळी दिल्या.

यावेळी उपजिल्हाधिकारी (महसूल) विजयकुमार ढगे, तहसीलदार (महसूल) श्रीमती ज्योती गुंजाळ तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अभियानाच्या माध्यमातून पात्र नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने व नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# किनगावात दुचाकी चोर सतर्कतेमुळे जेरबंद

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**किनगाव** प्रतिनिधी

यावल तालुक्यातील किनगाव येथे नागरिकांच्या सतर्कतेमुळे दुचाकी चोरी करणाऱ्या संशयिताला अवघ्या काही तासांत पकडण्यात यश आले. पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेत चोरीची दुचाकी जप्त केली असून पुढील तपास सुरू आहे. किनगाव येथील आत्माराम नगर परिसरात राहणारे हैदर मिरखा ताडवी यांनी गुरुवारी सकाळी घराबाहेर उभी केलेली त्यांची एम एच १९ ईआर ८७५६ क्रमांकाची मोटारसायकल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. त्यांनी परिसरात दुचाकीचा शोध घेतला; मात्र ती न सापडल्याने यावल पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली. दरम्यान, सायंकाळच्या सुमारास किनगावच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एका तरुणाला चोरीची दुचाकी घेऊन संशयास्पदरीत्या फिरताना नागरिकांनी पाहिले. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने



नागरिकांनी त्याला अडवून विचारपूस केली. मात्र तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागल्याने नागरिकांनी तत्काळ यावल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रंगनाथ धरबाळे यांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक धरबाळे यांनी तातडीने पथक घटनास्थळी पाठविले. पोलिसांनी संशयित रुपेश अशोक मराठे (वय २५, रा. आडगाव, ता. यावल) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत संशयितावर यापूर्वीही धारणगाव व भडगाव येथे दुचाकी चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) वसंत बेलदार करीत आहेत.

# समाज कल्याण विभागाच्या विविध समित्यांच्या बैठकी



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती कक्षात अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकर यांच्या अध्यक्षतेखाली समाज कल्याण विभागाच्या विविध समित्यांच्या बैठका संपन्न झाल्या. यावेळी एरंडोलचे उपविभागीय अधिकारी मनीष कुमार गायकवाड, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त योगेश पाटील, पोलीस विभागाचे अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत माहे जून २०२६ मध्ये घडलेल्या गुन्ह्यांचा, पोलीस तपासाचा तसेच न्यायालयात प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या कायद्यांतर्गत पात्र ठरलेल्या १९ प्रकरणांतील पीडितांना एकूण रु. २० लाख अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले. नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर, पूर्ण व अपूर्ण घरकुलांचा आढावा घेण्यात आला. नगरपालिकांकडून प्राप्त ६ पात्र लाभार्थ्यांच्या घरकुल प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. जादूटोणा विरोधी कायद्याबाबत जनजागृती, प्रचार व प्रसारासाठी वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भाग, शाळा, महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी व्यापक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. तृतीयपंथी व्यक्तींच्या स्वरोजगार व व्यवसायासाठी राबविण्यात येणाऱ्या बीज भांडवल योजनेअंतर्गत जिल्ह्यात चार ठिकाणी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच प्राप्त झालेल्या ४ पात्र प्रकरणांना अर्थसहाय्यासाठी शिफारस करून संबंधित बँकांकडे प्रस्ताव सादर करण्यास समितीने मान्यता दिली. बैठकीत विविध समाज कल्याण योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पात्र लाभार्थ्यांना वेळेत लाभ उपलब्ध करून देणे तसेच सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टांची प्रभावी पूर्तता करण्याबाबत संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

# आठ हजार सायकलिस्टच्या भव्य रिंगणाने वेधले लक्ष

## जळगावच्या ग्रुपसोबत महापौर दीपमाला काळे सहभागी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव/पंढरपूर** प्रतिनिधी

जळगाव सायकलिस्ट ग्रुपतर्फे आयोजित करण्यात आलेली वार्षिक पंढरपूर सायकल वारी यंदाही अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. महापौर दीपमाला मनोज काळे यांनी स्वतः सायकल चालवत सलग दुसऱ्या वर्षी या वारीमध्ये सहभाग घेतला. रविवारी पंढरपुरात राज्यभरातून आलेल्या ८ हजार सायकलिस्टनी सुरुवातीला पंढरपूर शहराला फेरी मारून नंतर घडवून आणलेल्या भव्य आणि



शिस्तबद्ध सायकल रिंगणाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. वारीच्या सांगता सोहळ्यात रविवारी, दिनांक १२ जुलै रोजी पंढरपूर येथे एक अभूतपूर्व सोहळा रंगला. संपूर्ण महाराष्ट्रभरातून आलेल्या विविध सायकलिस्ट ग्रुपच्या सुमारे ८ हजार सायकलपटूंनी पंढरपूरमध्ये सायकलचे एक मोठे आणि भव्य रिंगण तयार केले. या आधी पंढरपूर शहराला देखील त्यांनी पूर्ण एक फेरी मारून मग रिंगण बनवून ते पूर्ण केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही हे शिस्तबद्ध आणि विहंगम रिंगण पाहण्यासाठी पंढरीत मोठी गर्दी झाली होती. या सायकल रिंगणाने प्रत्येक भाविकाचे डोळे आणि मन मोहून घेतले. या ऐतिहासिक रिंगण सोहळ्यात जळगावच्या महापौर दीपमाला काळे आणि जळगावातील ७५ सायकलिस्ट असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभागी झाले होते.

# नगर परिषदेच्या कचरा व्यवस्थापनावर सवाल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मोरगाव** प्रतिनिधी

रावेर नगर परिषदेच्या घंटागाडीद्वारे आठवडे बाजाराच्या आवारात कचरा टाकण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या ठिकाणी टाकलेला कचरा वाऱ्यामुळे संपूर्ण बाजार परिसरात विखुरला जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे आठवडे बाजारात अस्वच्छता वाढत असून व्यापारी व नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या प्रकारामुळे कचरा बाजाराच्या आवारात टाकण्यापूर्वी त्याचे योग्य नियोजन करण्यात आले होते का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. रावेरच्या आठवडे बाजारात अस्वच्छतेची समस्या वारंवार जाणवत असल्याचीही नागरिकांची तक्रार आहे. नगर परिषदेने या प्रकरणाची दखल घेऊन कचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि बाजार परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, फोटोमध्ये दिसणारी इमारत विद्यमान नगरसेवकांची असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे. मात्र या घटनेशी



त्या इमारतीचा किंवा संबंधित व्यक्तींचा कोणताही संबंध असल्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

# यावल शहरासह तालुक्यात मोकाट कुत्र्यांचा हैदोस

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल शहर** प्रतिनिधी

यावल शहरासह तालुक्यात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांसह शाळकरी विद्यार्थी आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे अनेकांना चावा घेतल्याच्या घटना घडत असल्याने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. यावल शहरासह दहिगाव, सावखेडासिम, चुंचाळे, बोराळे आदी गावांमध्ये मोकाट कुत्र्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले



आहे. ही कुत्री सार्वजनिक चौक, रस्ते तसेच वाहनांच्या आडोशाला थांबत असल्याने नागरिकांना सतत भीतीच्या वातावरणात वावरावे लागत आहे. विशेषतः शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असून अनेक विद्यार्थ्यांना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. काहींना गंभीर दुखापतही झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यावल शहरातील प्रमुख रस्त्यांवरही मोकाट कुत्र्यांचे कळप वाहनांच्या मागे धावत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. अनेक वाहनचालक घाबरून तोल जाऊन जखमी झाल्याच्या घटनाही घडत असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी शहरातील एका दोन वर्षीय चिमुकलीला मोकाट कुत्र्याने चावा घेतल्याची घटना घडली असून ती गंभीर जखमी झाल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. मोकाट कुत्र्यांमुळे परिसरात अस्वच्छताही वाढत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे नगरपालिका तसेच संबंधित ग्रामपंचायतींनी तातडीने कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिक व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# संत चोखोबा म्हणजे समरसतेचे प्रतीक!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**देऊळगाव राजा** प्रतिनिधी

''संतश्रेष्ठ चोखामेळा महाराज हे वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम महाराज यांच्या परंपरेतील श्रेष्ठ संत असून, ते समरसतेचे प्रतीक आहेत. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येक वारकरी चोखोबांच्या पायरीला नतमस्तक होऊनच विठ्ठलाचे दर्शन घेतो. हाच त्यांना मिळालेला सर्वोच्च सन्मान



आहे,'' असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद, बुलढाणा जिल्हा मंत्री माधव धुंदाळे यांनी केले. संतश्रेष्ठ चोखामेळा महाराजांच्या पवित्र जन्मभूमी श्रीक्षेत्र मेहुणाराजा येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडी सोहळ्याचे १० जुलै रोजी देऊळगाव राजा येथे विश्व हिंदू परिषद, बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात माधव धुंदाळे बोलत होते. यावेळी विश्व हिंदू परिषद देऊळगाव राजा प्रखंड अध्यक्ष मनीष काबरा, जिल्हा सहमंत्री ज्ञानेश्वर माळोदे, भाजप नेते डॉ. सुनील कायंदे, बजरंग दल जिल्हा सहसंयोजक अरुण देशमुख, धर्माचार्य संपर्क प्रमुख रमेश सनानसे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बजरंग दल प्रखंड संयोजक संभाजी शिंगणे, भरत राऊत, रवी तुपकर, प्रवीण जोरवार, आनंद सुपारकर, अविनाश भावसार, अरुण खंडागळे, प्रथमेश शिंगणे, निलेश भुतेकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## महिलेची १३ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक

**पाचोरा :** पाचोरा शहरात प्लॉट विक्रीच्या व्यवहारात एका महिलेची १३ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पाचोरा पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनाली संदीप शेवरे (वय ४४, रा. गणेश कॉलनी, पाचोरा) यांनी फिर्याद दिली आहे. घर बांधण्यासाठी त्यांनी पाचोरा शहरातील सिटी सर्व्हे क्रमांक ३०३५, गट क्रमांक ३५, प्लॉट क्रमांक २२ मधील जागेचा व्यवहार केला होता. फिर्यादीनुसार, रविंद्रसिंग सुमेरसिंग राजपूत (रा. पाचोरा) याने संबंधित प्लॉट स्वतःच्या मालकीचा असल्याचे सांगून दि. ५ ऑगस्ट २०२४ ते दि. १ जून २०२६ या कालावधीत विविध टप्प्यांमध्ये फिर्यादीकडून १३ लाख ५१ हजार रुपये स्वीकारले. मात्र, रक्कम घेतल्यानंतरही प्लॉटचा ताबा अथवा आवश्यक कागदपत्रे न देता आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) अन्वये दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि प्रदीप शेवाळे करीत आहे.

### महत्वाचे

### जुन्या वादातून महिलेवर काठीने हल्ला

**पाचोरा :** तालुक्यातील लोहारा येथे जुन्या वादाच्या कारणावरून एका ५८ वर्षीय महिलेवर काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी हरिश्वर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला आपल्या घराच्या ओट्यावर बसलेली असताना शेजारी राहणारा एक व्यक्ती मद्यधुंद अवस्थेत त्यांच्या घरासमोर आला. त्याने शिवीगाळ करत घरासमोर पडलेली काठी उचलून महिलेच्या उजव्या हातावर मारहाण केली. या हल्ल्यात महिला जखमी झाली. घटनेदरम्यान दुसरी महिला देखील तेथे आली. दोघांनीही फिर्यादी महिलेशी वाद घालत शिवीगाळ केली. तसेच फिर्यादी व त्यांच्या मुलाला आमच्या नादी लागलात तर जीवे मारू, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी हरिश्वर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार शांतिलाल पगारे करीत आहे.

### शेतातील गोठ्यातून जनावरे चोरी

**एरंडोल :** तालुक्यातील कासोदा परिसरात शेतातील गोठ्यात बांधून ठेवलेली बैल, गायी व गोरे अशी एकूण ४३ हजार रुपये किमतीची जनावरे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कासोदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इलियास खान युसुफ खान (वय ३०, रा. बेलदार मोहल्ला, कासोदा) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांची जनावरे कासोदा गावाजवळील पारोळा रस्त्यालगत गट क्रमांक २४ व २५ मधील शेतातील गोठ्यात बांधून ठेवण्यात आली होती. दि. ७ जुलै रोजी सायंकाळी ६ ते दि. ८ जुलै रोजी सकाळी ७ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी गोठ्यातून जनावरे चोरून नेली. चोरीचा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. या प्रकरणी कासोदा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १०५/२०२६ नोंद करण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत अंकुश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

# रावेरमध्ये दरोड्याचा कट उधळला; दोघांना बेड्या

## तलवार, टॉमी, मिरचीपूड, दोरखंड, बनावट नोटा आणि कार जप्त

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**रावेर** प्रतिनिधी



शहरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा रावेर पोलिसांनी धाडसी पाठलाग करून कट उधळून लावला. या कारवाईत दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून तलवार, टॉमी, मिरचीपूड, दोरखंड, बनावट नोटा आणि इको कारसह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर त्यांच्या तिघा साथीदारांनी अंधाराचा व शेतशिवाराचा फायदा घेत पसार होण्यात यश मिळविले.

पाल दुर्गक्षेत्र येथे कर्तव्यावर असलेल्या पोलीस हेड कॉन्स्टेबल ईश्वर चव्हाण यांना पाल गावातून संशयास्पद इको कार रावेरकडे भरधाव जात असल्याची माहिती मिळाली. ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी गुन्हे शोध पथकाला तातडीने रवाना करत दोन्ही बाजूंनी नाकाबंदीचे नियोजन केले. आभोडा गावाजवळ पोलिसांना संशयित वाहन दिसताच चालकाने भरधाव वेगाने पळ काढला. रावेर शहरातील आठवडे बाजार परिसरातून बऱ्हाणपूर रस्त्यावरील शेताकडे जाताना वाहन चिखलात अडकल्याने संशयितांचा पळून जाण्याचा प्रयत्न फसला. यावेळी पोलिसांसह स्थानिक नागरिकांनीही पाठलाग केला. त्यापैकी तिघेजण शेतातून पसार झाले, तर दोघांना नागरिकांनी पकडले. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून दोघांना सुरक्षित ताब्यात घेत उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

वाहनाची तपासणी केली असता त्यामधून लोखंडी तलवार, टॉमी, पेंचिस, लाल मिरचीपूड, दोरखंड, सुमारे तीन लाख रुपये दर्शनी मूल्याच्या चिल्ड्रन बँकेच्या बनावट नोटा तसेच एमएच-१९-ईए-२४०३ क्रमांकाची मारुती सुझुकी इको कार जप्त करण्यात आली. प्राथमिक तपासात संशयित रावेर शहरात गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात निखिल प्रविण पाटील (वय २०) आणि अल्ताफ जलाल शेख (वय २६, दोघे रा. साईनगर, कासार वडवली, जि. ठाणे) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. मेहरबान जहांगीर तडवी (रा. पाल) याच्यासह अन्य दोन साथीदारांचा शोध सुरू आहे. या प्रकरणी रावेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांसह शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या टोळीचा इतर गुन्ह्यांशी संबंध आहे का, ते कोणत्या ठिकाणी आणि कोणत्या उद्देशाने गुन्हा करण्याच्या तयारीत होते, याचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन, तुषार पाटील तसेच रावेर गुन्हे शोध पथकाने केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तुषार पाटील करीत आहेत.

### प्रशासनाला दिला तीव्र इशारा : पदाधिकाऱ्यांनी केली पाहणी

## कचरा डेपोच्या कामावर लोकप्रतिनिधींचा संताप!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

शहरातील डम्पिंग ग्राऊंडच्या अत्यंत धिम्या गतीने सुरू असलेल्या कामावर लोकप्रतिनिधींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी सभापती चंद्रशेखर पाटील, नगरसेविका जयश्री पाटील, गजानन देशमुख यांनी कचरा डेपोच्या (डम्पिंग) कामाची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली.

दरम्यान पुण्यातील मोशी येथील डम्पिंग ग्राऊंडवर झालेली भीषण दुर्घटना आपल्याकडे घडू नये, यासाठी वेळीच खबरदारी घेण्याच्या आणि सुरक्षा उपाययोजना कडक करण्याच्या सूचना उपमहापौर व सभापतींनी मनपा प्रशासनाला व ठेकेदाराला दिल्या. तसेच संथ गतीने सुरू असलेल्या कामाचा वेग तात्काळ वाढवण्याचे आदेश दिले. डम्पिंग ग्राऊंडच्या ठिकाणी कचऱ्याला लागणाऱ्या आगीमुळे आणि निघणाऱ्या विषारी धुरामुळे आजूबाजूच्या खेड्यांमधील तसेच मनपा क्षेत्रातील रहिवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या प्रदूषणाचा स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर अत्यंत घातक परिणाम होत आहे. परिसरात त्वचेचे विकार (स्किन इन्फेक्शन) आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे रुग्ण आढळून येत असल्याबद्दल लोकप्रतिनिधींनी तीव्र चिंता व संताप व्यक्त केला. नागरिकांच्या जिवाशी चाललेला खेळ खपवून घेतला जाणार नाही असा थेट इशारा यावेळी प्रशासनाला देण्यात आला.

### अधिकाऱ्यांसमोर मांडल्या समस्या

या पाहणी दौऱ्यादरम्यान मनपाचे वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी स्थानिक नागरिकांनी प्रत्यक्ष अधिकाऱ्यांसमोर आपल्या तीव्र व्यथा आणि समस्या मांडल्या. प्रशासनाने कामात कोणतीही दिरंगाई न करता, लवकरात लवकर नागरिकांना या आरोग्याच्या त्रासातून मुक्त करावे, अशी आक्रमक मागणी लोकप्रतिनिधींनी लावून धरली आहे.

## ६१ हजार २२९ मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा ऐतिहासिक टप्पा

### ह.भ.प. अंजाळेकर महाराज नेत्रालयाच्या मोतीबिंदू निर्मूलन अभियानाला यश

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



गोदावरी फाउंडेशन डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय संचलित ह.भ.प जगन्नाथ महाराज अंजाळेकर नेत्रालयाने खान्देश, विदर्भ आणि संभाजीनगर विभागात राबविलेल्या मोतीबिंदू निर्मूलन अभियानाने एक ऐतिहासिक टप्पा गाठला असून, सन २००८ ते २०२६ या कालावधीत तब्बल ६१ हजार २२९ मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत.

या शिबिरांमधून गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांची निवड करून त्यांच्यावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मोतीबिंदू निर्मूलन अभियानाच्या यशामध्ये डॉ. एन एस आर्विकर,डॉ. प्रेमचंद पंडीत यांच्या मार्गदर्शनाखाली मोतीबिंदू मुक्त शिबिराचे समन्वय डॉ. नि. तु. पाटील, डॉ. रेणुका पाटील, डॉ. मयुरी निलावड, डॉ. निखिल चौधरी, डॉ. संकेत पाटील, डॉ. नेहा नारखेडे, डॉ. शुभम भारसाकळे, डॉ. जतिन बाविस्कर, डॉ. उर्मी गायकवाड, डॉ. अनिष कांदळगावकर, डॉ. अभिजीत काकड, डॉ. दिव्या पोखरणकर, डॉ. मुग्धा बिचकर, डॉ. किर्ती महाजन, डॉ. ऋतुजा चव्हाण, डॉ. रिया गोरे, डॉ. गौरव पाटील, डॉ. वैष्णव व्यवहारे आणि डॉ. अश्विनी काकडे तसेच सबा शेख, प्रतिक्षा सुटे, तृप्ती भोयरकर, स्वाती खरे, खुशी कांबळे आणि संजय महाजन यांनी सहकार्य केले.

गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे हे अभियान ग्रामीण व दुर्गम भागांपर्यंत प्रभावीपणे पोहोचले. याप्रसंगी डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले की, ह.भ.प जगन्नाथ महाराज अंजाळेकर आणि दिवंगत श्रीमती गोदावरी आजी यांच्या सेवाभाव, करुणा आणि समाजाप्रती असलेल्या समर्पणातूनच या अभियानाला प्रेरणा मिळाली. त्यांचे आशीर्वाद आणि संस्कार हेच या जनसेवेचे खरे बळ असून, भविष्यातही एकही गरजू रुग्ण उपचारापासून वंचित राहू नये, यासाठी हे अभियान अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहील. पहाटे ५ वाजेपासून शस्त्रक्रियांना प्रारंभ करून शिबिराच्या गावी जाणारे आमचे डॉक्टर आणि त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे.

## हॉजकिन्स हायटेक्स ठरला मॉर्फोमाइंडचा विजेता

### डॉ. पाटील वैद्यकीय महाविद्यालयात शैक्षणिक पॅथॉलॉजी क्विझ स्पर्धा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या पॅथॉलॉजी विभागातर्फे मॉर्फोमाइंड या शैक्षणिक पॅथॉलॉजी क्विझ स्पर्धेचे आयोजन डॉ. केतकी पाटील हॉल येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या स्पर्धेत हॉजकिन्स हायटेक्स हा विजेता ठरला.

विद्यार्थ्यांमध्ये पॅथॉलॉजी विषयाची सखोल समज विकसित करणे, स्पर्धात्मक वृत्तीला प्रोत्साहन देणे आणि शैक्षणिक गुणवत्तेला चालना देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोलंकी, रजिष्ट्रार प्रमोद भिरूड, डॉ. धनंजय बोरोले उपस्थित होते. स्पर्धेत कूलीज क्युरेटर्स, अस्कानाझी ॲनालिस्ट्स, काजल्स क्रॅकर्स, ऑस्लर्स ऑसम्स, कूम्ब्स कॉन्क्लेव्ह आणि हॉजकिन्स हायटेक्स अशा सहा संघांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. स्पर्धेत विविध ज्ञानवर्धक आणि परस्परसंवादी फेऱ्यांचा समावेश करण्यात आला होता. अंतिम फेरीत हॉजकिन्स हायटेक्स संघाने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळविले. अस्कानाझी ॲनालिस्ट्स संघाने द्वितीय (प्रथम उपविजेता) तर ऑस्लर्स ऑसम्स संघाने तृतीय (द्वितीय उपविजेता) क्रमांक मिळविला.विजेत्या संघांना पॅथॉलॉजी विभागप्रमुख डॉ. धनंजय बोरोले यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. रेश्मा वानखेडे, डॉ. निकिता ठाकूर यांनी केले.

### पानटपरी चालकाला अटक : अन्न सुरक्षा विभाग, पोलिसांची

## फैजपूरमध्ये प्रतिबंधित गुटखा जप्त

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**फैजपूर** प्रतिनिधी

फैजपूर-यावल रोडवरील तुळशी पान अँड कोल्ड्रिंक्स या दुकानावर अन्न सुरक्षा विभाग आणि फैजपूर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा जप्त केला. या प्रकरणी दुकान चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी आकाश कैलास बो-हाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. दि. ९ जुलै रोजी दुपारी सुमारे ४:४० वाजता फैजपूर-यावल रोडवरील दुकानाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान कर्मचंद पान मसाला या प्रतिबंधित गुटख्याची १९ पाकिटे आढळून आली. जप्त करण्यात आलेल्या गुटख्याची किंमत ३ हजार ४० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी दुकान चालक तुळशीदास दिगंबर चौधरी (वय ३६, रा. आराधना कॉलनी, फैजपूर, ता. यावल) याच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये फैजपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयिताला अटक करण्यात आली आहे. मानवी आरोग्यास अपायकारक आणि महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची साठवणूक व विक्री केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद गावभणे करीत आहेत.

## ९० हजारांची लाच घेताना अंमलदार एसीबीच्या जाळ्यात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भुसावळ** प्रतिनिधी

चिकनचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायीकाला गुटख्याची वाहतूक करीत असल्याचा दम भरून कारवाईची भीती दाखवत ९० हजारांची लाच मागण्यात आली मात्र तक्रारदाराने तक्रार दिल्यानंतर सापळा रचून नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आरोपी अंमलदाराला बेड्या ठोकल्या. ही कारवाई दि. १० जुलै रोजी रात्री उशिरा करण्यात आली. या घटनेमुळे पोलिस दलातील लाचखोर हादरले आहेत. मनोज दगू गायकवाड (३७) असे अटकेतील पोलिस अंमलदाराचे नाव असून तो नाशिक ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या पेठ पोलिस ठाण्यात कार्यरत आहे.

तक्रारदार हे चिकन विक्रीचा व्यवसाय करतात व गुजरातच्या सुतारपाडा गावात त्यांचे चिकन शॉप आहे. कोंबड्याची खरेदी करून ते स्वीप्टने कोंबड्या व्यवसायासाठी नेतात. अंमलदार गायकवाड जून महिन्यात वाहन अडवत तक्रारदाराला गुटख्याची वाहतूक करीत असल्याचे सांगून गुन्हा दाखल करण्याची भीती घातली व कारवाई न करण्यासाठी ६० हजार रुपये उकले व त्यानंतरही गायकवाड यांचा त्रास थांबला नाही. ५ जुलै रोजी गायकवाड याने फोन करीत गुटख्याची वाहतूक सुरू असल्याचे सांगत कोंबड्याचीही वाहतूक सुरळीत सुरू ठेवण्यासाठी एक लाखांची लाच मागितली मात्र यावेळी तक्रारदाराने नाशिक एसीबीकडे तक्रार दिल्यानंतर पडताळणी करण्यात आली असता तडजोडीअंती आरोपीने ९० हजारांचे लाच स्वीकारण्याचे मान्य केले.

### हॉटेलबाहेर सापळा रचून पकडले

राऊ हॉटेल समोरील आमदार गुळाचा चहा दुकानासमोर लाच स्वीकारण्यासाठी गायकवाड आला व त्याने तक्रारदाराकडून लाच स्वीकारताच पथकाने त्यास अटक केली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारित २०१८) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस उपअधीक्षक सुरेश शिरसाठ, हवालदार प्रमोद चव्हाणके, अंमलदार संजय ठाकरे, अंमलदार योगेश शिंदे आदींच्या पथकाने हा सापळा यशस्वी केला.

# पंढरीची वारी माहितीपटातून सांस्कृतिक वारशाचे दर्शन!

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत माहितीपटाचा प्रीमियर शो

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी



जातपात- धर्मापलीकडे मानवतेची पताका खांद्यावर घेत... डोळ्यांत विठ्ठल माऊलीच्या भेटीची आर्त ओढ साठवत... टाळ- मृदुंगाच्या गजरात... देहभान हरपत शेकडो मैल चालूनही अलौकिक चैतन्याची प्रचिती अनुभवत आणि माणसा-माणसांत साक्षात विठूरायाचे दर्शन घडविणाऱ्या पंढरीच्या वारीचा विस्मयकारक, अद्भूत आणि भव्य प्रवास आता रुपेरी पडद्यावर एका देखण्या माहितीपटाच्या माध्यमातून अवतरला आहे. पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा या माहितीपटाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विशेष खेळ (प्रीमियर शो) झाला.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनीने या माहितीपटाची निर्मिती केली आहे. त्याचा प्रीमियर शो येथील आयनॉक्स चित्रपटगृहात झाला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे उपस्थित होते.

पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा हा माहितीपट २२ मिनिटांचा आहे. मराठी, इंग्रजी, हिंदी, तमीळ, तेलगू, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे. त्यात डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स आणि डिस्कव्हरी टर्बो अशा नऊ वाहिन्यांचा समावेश आहे. पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा या माहितीपटाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचे डिजिटल युगातले एक सदस्तऐवजीकरण करण्यात आले आहे.

### सांस्कृतिक संचित जगासमोर : फडणवीस

देशातल्या भक्ती मार्गातली वारी ही सर्वात प्राचीन परंपरा आहे, ती सर्वांना मोठी ऊर्जा देते. धर्म- जात, भाषा, गरीब- श्रीमंत, असा कुठलाही भेद न करता सर्वांना विठूरायाच्या रंगी रंगविणारी माऊलीची ही वारी महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित आहे. ही परंपरा आणि संचित जगासमोर आले पाहिजे, यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनीच्या माध्यमातून नेत्रदीपक माहितीपट तयार करण्यात आला आहे. वारीचे उद्दिष्ट काय? त्या मागची प्रेरणा काय? त्यात सहभागी होणाऱ्यांच्या मनातले विचार काय? वारीची पद्धती काय? हा सगळ्यांचा उलगडा या माहितीपटातून होतो. आपण विश्वात्मकेसाठी देवाला साकळे घालणारे लोक आहोत, याची प्रचिती या माहितीपटातून येते, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रसंगी काढले.